


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३०६ ■ शनिवार, दि.१६ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# यंदा कपाशीच्या बियाण्यांची मागणीच नाही

**▸▸कापूस उत्पादकांचा संताप ▸▸ शेतकऱ्यांची नाराजी ▸▸ केंद्र सरकारच्या आयात धोरणाचा निषेध !**

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** विदर्भातील अर्थकारणाचा कणा असलेल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये सध्या केंद्र सरकार आणि स्थानिक प्रशासनाविरोधात कमालीची नाराजी पसरली आहे. गेल्या वर्षी कापसाला योग्य भाव न मिळाल्यामुळे आणि 'सीसीआय'च्या (भारतीय कापूस निगम) केंद्रांच्या मनमानी कारभारामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. याचा थेट परिणाम थेट कापूस उत्पादकांवर झाला असून, यंदा कापसाच्या बियाण्यांची मागणी प्रचंड घटल्याचे विदारक चित्र समोर आले आहे.

गेल्यावर्षी कापूस शेतकऱ्यांच्या हाताशी येत असताना केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क माफ करत शेतकऱ्यांचे कबरंडे मोडले होते. त्यामुळे यंदा शेतकऱ्यांची तीव्र नाराजी असून कापूस सोडून काही पण पिकवू अशी भूमिका शेतकरी घेत आहे.



### कापूस पिकविणे बंद झाल्यास

अकोला आणि विदर्भातील कापूस उत्पादकांनी कापूस पिकविणे बंद केल्यास जिनिंग आणि प्रेसिंग उद्योजक अचडणीत येण्याची समस्या कायम आहे. पण, या उद्योगांनी शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य भाव देण्याची गरज आहे. तसे न झाल्यास हा उद्योग येथे मोडकळीस येण्याची चिन्हं आहे. यंदाच्या हंगामासाठी केंद्र सरकारने ८,६६७ रुपये प्रतिक्विंटल कापूस खरेदीचे धोरण जाहिर केले. पण, हमी भावाच्या (शेतकऱ्यांना हमी भावाची कायदेशीर सुरक्षा नसल्याने ) खालीच सर्वत्र व्यापारी कापूस खरेदी करत असल्यामुळे शेतकऱ्यांची मोठी नाराजी सरकारवर आहे.

### 'सीसीआय'ची मनमानी आणि केंद्रांचा अभाव

शेतकऱ्यांना हमीभाव मिळवून देण्यासाठी स्थापन करण्यात आलेली सीसीआय केंद्रे अकोला जिल्ह्यात अपुरी आहेत. जी केंद्रे सुरू आहेत, तिथे अधिकाऱ्यांची मनमानी आणि जाचक अटींमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. ग्रेडिंगच्या नावाखाली शेतकऱ्यांचा उत्तम दर्जाचा कापूस कमी भावात खरेदी केला जात असल्याचा आरोप होत आहे. व्यापाऱ्यांचे आणि अधिकाऱ्यांचे संगनमत असल्यानेच कापूस उत्पादकांची कोंडी केली जात असल्याचे बोलले जात आहे.

### बियाणे बाजारात शुकशुकाट; शेतकरी फिरवणार पाठ ?

या सर्व प्रकारामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी आता कापूस लागवडीकडेच पाठ फिरवण्यास सुरुवात केली आहे. कृषी केंद्रांवर यंदा कापूस बियाण्यांची मागणी कमालीची घटली आहे. शेतकरी आता कापसाऐवजी सोयाबीन किंवा इतर पिकांकडे वळण्याच्या तयारीत आहेत. जर हीच परिस्थिती राहिली, तर आगामी काळात कापसाचे उत्पादन घटण्याची भीती कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### राज्यातील कापूस लागवडीची स्थिती घसरतीच

| | |
|---|---|
| २०२३ | ४२.२२ लाख हेक्टर. |
| २०२४ | ४०.८४ लाख हेक्टर. |
| २०२५ | २५.५७ लाख हेक्टर. |

### घरात शेकडो क्विंटल कापूस पडून!

अकोला आणि संपूर्ण विदर्भ प्रांतातील शेतकऱ्यांच्या घरात आज शेकडो क्विंटल कापूस पडून आहे. 'गेल्या वर्षी वर्षभर घाम गाळून कापूस पिकवला, पण बाजारात नेल्यावर मातीमोल भाव मिळाला,' अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. भाव वाढतील या आशेने शेतकऱ्यांनी कापूस घरातच साठवून ठेवला, मात्र केंद्राच्या चुकीच्या धोरणांमुळे कापसाचे भाव गडगडले. आता नवीन हंगाम तोंडावर आला असताना जुनाच कापूस घरात पडून असल्याने पुढील शेती कशी करावी, हा यक्षप्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे.

### केंद्र सरकारच्या आयात धोरणाचा तीव्र निषेध

शेतकऱ्यांच्या या दुरवस्थेला केंद्र सरकारचे कापूस आयात धोरण कारणीभूत असल्याचा आरोप कापूस उत्पादक करत आहेत. देशात पुरेसा कापूस उपलब्ध असतानाही परदेशातून मोठ्या प्रमाणावर कापूस आयात केला जात आहे, ज्यामुळे स्थानिक बाजारातील कापसाचे भाव पार घसरले आहेत. सरकारच्या या शेतकरीविरोधी धोरणाचा अकोल्यातील शेतकरी संघटनांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे.

### टेक्सटाईल मिल उद्योगासाठी रेड कार्पेट

केंद्र सरकारने १९ ऑगस्ट २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत कच्च्या कापसावरील ११ टक्के आयात शुल्क पूर्णपणे माफ केल आहे. टेक्सटाईल उद्योगाच्या फायद्यासाठी पुढे ३१ डिसेंबर पर्यंत आयात शुल्क माफीचा निर्णय कायम होता. यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले होते. केंद्राच्या या निर्णयामुळे मात्र देशांतर्गत कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला होता.कापूस उत्पादनाचा खर्च वाढलेला असताना पुन्हा एकदा तामिलनाडूतील नवे सरकार आणि टेक्सटाईल उद्योग कापूस आयात शुल्क कायमचे माफ करण्याची मागणी करत आहे.

# 'नीट' पेपरफुटीचा मास्टरमाईंड सीबीआयच्या जाळ्यात !

प्रतिनिधी १६ मे

**पुणे :** देशभर खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी आणि कोट्यवधींच्या घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) मुख्य सूत्रधार लातूरचा माजी प्राध्यापक पी.व्ही. कुलकर्णी असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सीबीआयने त्याला पुण्यातून अटक केली असून आज त्याला दिल्लीतील न्यायालयात हजर केले जाण्याची शक्यता आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या (एनटीए) अतिशय गोपनीय अशा प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समितीशी कुलकर्णी संबंधित असल्याने शिक्षण वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणात देशभरातून अटक झालेल्या एकूण आरोपींची संख्या आता ८ वर पोहोचली आहे.

पी. व्ही. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा नामांकित प्राध्यापक आहे. लातूर येथील नामांकित 'दयानंद महाविद्यालयात' कुलकर्णीने तब्बल २८ वर्षे अध्यापनाचे काम केले आहे. ५ ते ६ वर्षांपूर्वी तो सेवेतून निवृत्त झाला होता. लातूरच्या 'शिक्षण पंढरी'त बारावी विज्ञान शाखा आणि मेडिकल प्रवेश परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी त्याचा मोठा दबदबा होता. कुलकर्णी याचे लातूरमधील कैलास नगर येथे निवासस्थान आहे, मात्र त्याचे कुटुंबीय पुण्यात राहत असल्याने त्याचे लातूरमधील वास्तव्य कमी झाले होते. निवृत्तीनंतर तो पुण्यातच राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होता.

# मनोज जरांगे यांचे आमरण उपोषण!

**जालना :** मराठा आरक्षणावरुन पुन्हा एकदा रान तापलं आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आरक्षणासाठी पुन्हा मैदानात उतरणार आहेत. ३० मेपासून पुन्हा आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. अंतरवाली सराटीतच आमरण उपोषण होणार असल्याचं जरांगेंनी सांगितलं आहे.




# युवकाची हत्या...!

## एका आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** शहरातील अलंकार मार्केट मध्ये अज्ञात मारेकऱ्यांनी एका तरुणावर धारदार शस्त्राने सपासप वार करून त्याची हत्या केली. १५ मे रोजी रात्री साडेआठ ते नऊ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली. मृतकाचे नाव राहुल सारसर (२७) रा. विजयनगर असल्याचे कळते.

अलंकार मार्केट मधील राहुल सारसर हत्याकांडात पोलिसांनी बादशाह पारोचे नामक आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीची कसून चौकशी सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, घरगुती वादातून हल्ला करण्यात आला.

# अकोल्याला राज्यस्तरावरील तीन पुरस्कार प्राप्त !

**▸▸ प्रधानमंत्री आवास योजनेत पातूर तालुका राज्यात अव्वल ▸▸ केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांच्या हस्ते सन्मान**

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत सन २०२३-२४ च्या राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण सातारा येथील सैनिक स्कूल येथे शुक्रवार, १५ मे रोजी केंद्रीय ग्रामीणविकास मंत्री शिवराजसिंह चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार छत्रपती उदयनराजे



भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यस्तरीय पुरस्कारात पातूर तालुका प्रथम, जिल्हा तिसरा तर अकोट तालुक्यातील बेलुरा बु. ग्रामपंचायतने देखील तिसरा क्रमांक पटकावला आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम सातारा येथे शुक्रवार, १५ मे रोजी आयोजित करण्यात आला होता.




# यंदा जूनमध्येच 'एल निनो' सक्रिय होणार!

प्रतिनिधी १६ मे

**पुणे:** विषुववृत्तीय प्रशांत महासागराचे तापमान वेगाने वाढत असून, आता जूनमध्येच 'एल निनो 'ची स्थिती निर्माण होणार असल्याचा अंदाज अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरने (सीपीसी) वर्तवला आहे. मान्सूनच्या सुरुवातीलाच एल निनो विकसित होणार असल्याने यंदाच्या संपूर्ण हंगामावर एल निनोचा प्रभाव राहू शकतो, असा अंदाज वर्तवला जात आहे.

सीपीसीने नुकत्याच जारी केलेल्या अंदाजानुसार, विषुववृत्तीय प्रशांत महासागरात सध्या असलेली न्यूट्रल स्थिती लवकरच 'एल निनो'मध्ये रूपांतरित होण्याची शक्यता आहे. सलग पाचव्या महिन्यात तेथील समुद्रपृष्ठाच्या तापमानात वाढ नोंदली गेली असून, येत्या जूनमध्ये 'एल निनो'ची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आता ८२ टक्के झाली आहे. ही स्थिती पुढेही कायम राहून उत्तर गोलार्धातील हिवाळ्यात (डिसेंबर २६ ते फेब्रुवारी २७) एल निनो सक्रिय राहण्याची शक्यता ९६ झाली टक्के आहे. एकीकडे देशात मान्सूनचे आगमन होत असतानाच प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय होणे ही बाब हंगामी पावसाच्या दृष्टीने चिंताजनक असल्याचे हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
शनिवार, दि. १६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# साखर निर्यात बंदीचा परिणाम



केंद्र सरकारने १४ मे २०२६ रोजी साखर निर्यातीवर (कच्ची, पांढरी आणि रिफाईंड) ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत तात्काळ बंदी घातली आहे. या निर्णयाचा देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा परिणाम होणार आहे.

साखर निर्यात बंदीचे मुख्य परिणाम:

देशांतर्गत साखरेचे दर नियंत्रणात: देशांतर्गत बाजारात साखरेचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आणि दर स्थिर (नियंत्रणात) ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

साखरेची उपलब्धता वाढणार: या बंदीमुळे अंदाजे ४-५ लाख टन साखर देशांतर्गत वापरासाठी उपलब्ध होणार आहे. जागतिक स्तरावर साखरेचे दर वाढणार: भारत हा जगातील दुसरा सर्वात मोठा साखर उत्पादक देश असल्याने, या बंदीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेचे दर वाढण्याची शक्यता आहे.

साखर कारखान्यांच्या नफ्यावर परिणाम: साखर कारखान्यांच्या अल्पकालीन नफ्यावर (liquidity) नकारात्मक परिणाम होऊ शकतो. यामुळे कारखान्यांचे उत्पन्न कमी होऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या एफआरपी पेमेंटवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

काही निर्यातीला सवलत: अमेरिका आणि युरोपियन युनियनला विशेष कोट्यांतर्गत होणारी साखर निर्यात सुरू राहणार आहे.

बंदीची कारणे: कमी उत्पादन हे प्रमुख कारण आहे. २०२५-२६ हंगामात साखरेचे उत्पादन अंदाजापेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.

एल निनोचा धोका: हवामान बदलामुळे उत्पादनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन हे खबरदारीचे पाऊल उचलले आहे.

महागाई: देशांतर्गत साखरेचे वाढते दर रोखण्यासाठी सरकारने पाऊल उचलले आहे. थोडक्यात, ही निर्यात बंदी देशांतर्गत ग्राहकांसाठी साखरेचे दर स्थिर ठेवण्यास मदत करेल, परंतु साखर उद्योग आणि शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरू शकते. निर्यात बंदीमुळे महाराष्ट्रातील साखर उद्योग संकटात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सोहोळ अभयारण्य-काळविटांचे आश्रयस्थान



पर्यटनस्थळाची निवड करताना प्रत्येक जण आवडी-निवडीनुसार स्थळाची निवड करतो. त्यात कमी वेळ, कमी पैसा खर्च करून अधिकाधिक स्थळांना भेटी देणाऱ्या स्थळांना प्रथम पसंती दिली जाते. अकोला वन विभागाच्या अखत्यारीत असलेले कारंजा येथील सोहोळ अभयारण्य उत्तम पर्याय आहे. या भागातील काळविटांना आश्रयस्थान असावे या उद्देशाने अभयारण्याची निर्मिती झाली. अन्य प्राणी,पक्षी यांचाही संचार वाढला.

वाशिम जिल्ह्यातील कारंजा परिसरात सोहोळ अभयारण्य, स्थलांतरित पक्ष्यांचा मुक्काम असलेला ऋषी तलाव, कारंजाचे गुरू मंदिर असा तिहेरी संगम सहलीत साधता येतो. वाशीम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यात वसलेल्या कारंजा सोहोळ काळवीट अभयारण्याची निर्मिती मुळात शहरानजीकच्या शेतजमिनीवर हुंदडणाऱ्या काळविटांना हक्काचे आश्रयस्थान देण्याच्या उद्देशाने झाली. २००० साली राज्य शासनाने अभयारण्याची घोषणा केली. कारंजा परिक्षेत्रातील कारंजा, गिर्डा, दादगाव सोमठाणा या नियतक्षेत्रातील हजार ७८१.४० हेक्टर वनक्षेत्राचा अभयारण्यात समावेश करण्यात आला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी कारंजा यांच्याकडे अभयारण्याचे व्यवस्थापन आहे. कारंजा शहरापासून अवघ्या किलोमीटर अंतरावर हे अभयारण्य वसलेले आहे. अभयारण्याच्या दक्षिण बाजूने अडाण नदी वाहते, तर पूर्वेकडे यवतमाळ जिल्ह्याची सीमा असून, पश्चिमेस मंगरुळपीर तालुक्याची सीमा आहे. हे अभयारण्य अजिंठा डोंगराच्या परिसरात बहरले असून, अडाण नदीचे पाणी अभयारण्यासाठी वरदान ठरले आहे. या अभयारण्यात काळविटांसह नीलगाय, रानडुक्कर, तडस, कोल्हा, रानमांजर, ससे, मोर, सायाळ, मुंगूस, मसन्याऊद आदींचे दर्शन घडते. तसेच पक्षी प्रजातींचेही वास्तव्य आहे. यामध्ये मुख्यत्वे सर्पगरुड, माळ टिटवी, दयाळ, स्वर्गीय नर्तक, सोनपाठी सुतार, मराठा सुतार, हळद्या, कोतवाल, कवड्या, डोमकावळा, वेदराघू, खाटीक, चंडोल, राखी वटवट्या, तितर, बटेर आदींसह १४५ वर पक्ष्यांचे दर्शन घडते. अभयारण्यात मुख्यत्वे पळस, खैर, बेहडा, कळंब आदी वृक्ष प्रजाती आहे.

### गवताळ प्रदेश

मोठी गवती कुरणे अलीकडे लुप्त झाल्याने त्यांच्यावर गुजराण करणाऱ्या प्राणी, पक्ष्यांचे दर्शन घडत नाही. मात्र, कारंजा सोहोळ अभयारण्यात गवताळ प्रदेश मोठ्या प्रमाणावर असल्याने या ठिकाणी अनेक पशुपक्ष्यांचा अधिवास आहे. तसेच जंगल फारसे दाट नसल्याने नीलगायींचे कळप, काळविटांचे कळप, रानडुक्कर आदींचे दूरवरून दर्शन घडते. अभयारण्यास भेट देण्यासाठी अकोला वन विभाग किंवा वनपरिक्षेत्र अधिकारी कारंजा यांच्याशी संपर्क साधावा. तसेच अभयारण्यानजीक ऋषी तलाव असून, या तलावावर हिवाळयात पाहुण्या पक्ष्यांचा मुक्काम असतो. यामध्ये मुख्यत्वे रंगीत करकोचे, उघड्या चोचेचा करकोचा, चम्मचचोचे, सँडपायपर, नकटा, ब्राम्हणी डक, स्पॉटबिल डक आदींसह अनेक पक्ष्यांचे निरीक्षण करता येते. हा परिसर निसर्ग प्रेमींना साद घालत असतो.

सुरेश राठोड
अकोला

# दान पावलं... स्वगणना करा'!



खामगाव, शेगाव तालुक्यात 'वासुदेवा'च्या माध्यमातून जनगणनेबाबत जनजागृती भारतीय जनगणना २०२७ ही देशाची पहिली डिजिटल जनगणना असून केंद्र सरकारने नागरिकांसाठी 'स्वगणना' हा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. बुलढाणा जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या आवाहनानुसार खामगाव आणि शेगाव तालुक्यात जिल्हा महसूल प्रशासन व शाहू, फुले, आंबेडकर फाऊंडेशन, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'वासुदेव' या पुरातन लोककलेच्या माध्यमातून १२ मे ते १५ मेपर्यंत स्वगणनेबाबत जनजागृती मोहीम राबवण्यात आली.

जनजागृती मोहिमेमध्ये खामगाव तालुक्यातील घारोड, अकोली, अटाळी यासह विविध गाव आणि शेगाव तालुक्यातील उन्हाळखेड या गावांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक राजेश कोगदे यांनी वासुदेवाची पारंपरिक वेशभूषा धारण करून 'दान पावलं, दान पावलं वासुदेव आला... आता स्वगणना आली' म्हणत ग्रामीण भागात घरोघरी जाऊन नागरिकांचे प्रबोधन केल्याने याचा मोठा प्रभाव नागरिकांवर झाला. त्यामुळेच डिजिटल साक्षरता कमी असलेल्या नागरिकांपर्यंत स्वगणनेचा संदेश सहज पोहोचवण्यासाठी लोककलेचा प्रभावी वापर करण्यात येत आहे.या उपक्रमासाठी महसूल उपविभागीय अधिकारी डॉ रामेश्वर पुरी खामगाव तहसीलदार सुनील पाटील शेगाव तहसीलदार प्रज्ञा काकडे, यांच्यासह इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार सचिन ठाकरे, प्रा. बंडू कळंबे, महसूल कर्मचारी शेगाव उन्हाळखेड तलाठी नितीन जुमडे, खामगाव महसूल कर्मचारी हरीश वाणी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### मोहिमेची वैशिष्ट्ये

१. लोककलेतून थेट संवाद : ग्रामीण भागात वासुदेवाच्या सुरांना व सादाला लोक आदराने ऐकत असल्याने संदेश थेट व प्रभावीपणे पोहोचत आहे.

२. संभ्रम व भीती दूर : शासकीय प्रक्रियेबद्दल असणारा संभ्रम पारंपरिक लोकमाध्यमातून दूर होत असून नागरिक स्वतःहून प्रतिसाद देत आहेत.

३. प्रशासकीय व सामाजिक ताळमेळ : जिल्हा महसूल प्रशासन व शाहू, फुले, आंबेडकर फाउंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे मोहिमेला अधिकृतता व व्यापकता मिळाली आहे.

### उन्हाळखेड संपूर्ण स्वगणना केलेले जिल्ह्यातील पहिले गाव

शेगाव तालुक्यातील उन्हाळखेड हे गाव पूर्णपणे स्वगणना पूर्ण केलेले जिल्ह्यातील प्रथम गाव ठरले आहे. त्यामुळे विविध अधिकाऱ्यांच्या बैठका, नियोजनबद्ध संवाद तसेच जनजागृती यामुळे ही स्वगणना शक्य झाले आहे, अशी माहिती शेगाव तहसीलदार प्रज्ञा काकडे यांनी दिली आहे. उन्हाळखेड गाव संपूर्णपणे स्व गणना करण्यासाठी सर्वप्रथम पुढाकार घेणारे. त्या गावचे तलाठी नितीन जुमडे आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन वासुदेवाच्या माध्यमातून जनजागृती करून, संवाद बैठका घेऊन हे गाव स्वगणना करणारे पहिले गाव ठरल्याची किमया शक्य करून दाखवली आहे.

### स्वगणनेचे फायदे

१. वेळेची बचत : प्रगणक घरी येण्याची वाट पाहावी लागत नाही. सवडीनुसार ऑनलाइन माहिती भरता येते.

२. अचूकता : स्वतः माहिती भरल्यामुळे चुकांची शक्यता कमी होते.

३. गोपनीयता : पोर्टलवर भरलेला सर्व डेटा एनक्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित सरकारी सर्व्हरमध्ये साठवला जातो.



दिन विशेष

# राष्ट्रीय डेंग्यू दिवस



राष्ट्रीय डेंग्यू दिवस दरवर्षी १६ मे रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश डेंग्यू आजाराबद्दल जनजागृती करणे आणि लोकांना प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे हा आहे. डेंग्यू हा डासांमुळे पसरणारा संसर्गजन्य आजार असून, तो विशेषतः पावसाळ्यात अधिक प्रमाणात आढळतो.

डेंग्यूचा प्रसार प्रामुख्याने एडीस जातीच्या डासांमुळे होतो. हे डास स्वच्छ साचलेल्या पाण्यात वाढतात. घराभोवती टाकलेले जुने टायर, फुलदाण्या, कुलर किंवा पाण्याची टाकी यामध्ये पाणी साचल्यास डासांची उत्पत्ती वाढते. त्यामुळे परिसर स्वच्छ ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

डेंग्यूची लक्षणे म्हणजे तीव्र ताप, डोकेदुखी, सांधेदुखी, अंगदुखी, डोळ्यांच्या मागे वेदना आणि त्वचेवर पुरळ येणे. काही गंभीर रुग्णांमध्ये रक्तस्त्राव होण्याची शक्यता असते. योग्य वेळी उपचार घेतल्यास हा आजार नियंत्रणात येऊ शकतो.

राष्ट्रीय डेंग्यू दिवसानिमित्त शाळा, महाविद्यालये आणि आरोग्य संस्था विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करतात. लोकांना डासांपासून संरक्षणासाठी पूर्ण बाह्यांचे कपडे घालणे, मच्छरदाणी वापरणे आणि पाणी साचू न देणे यासारख्या उपायांची माहिती दिली जाते.

आपण सर्वांनी स्वच्छता राखून आणि योग्य काळजी घेऊन डेंग्यूसारख्या आजारांपासून स्वतःचे व समाजाचे संरक्षण केले पाहिजे. राष्ट्रीय डेंग्यू दिवस हा आरोग्यदायी आणि सुरक्षित जीवनासाठी जागरूकता निर्माण करणारा महत्त्वाचा दिवस आहे.

डेंग्यू बाबतीत सजगता बाळगणे आवश्यक आहे.

डासांपासून वाचण्यासाठी पूर्ण बाह्यांचे कपडे वापरा. झोपताना मच्छरदाणीचा वापर करा आणि खिडक्यांना जाळ्या बसवून घ्या. शरीरावर मॉस्किटो रिपेलेंट (डास पळवणारे क्रीम) लावा.

आजार झाल्यास काय काळजी घ्यावी?

रुग्णाने पूर्ण विश्रांती घेणे गरजेचे आहे.

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ देऊ नये. यासाठी भरपूर पाणी, नारळपाणी, ओ.आर.एस. किंवा ताजी फळांचा रस प्यावा.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय 'अस्पिरिन' किंवा 'इबुप्रोफेन' सारखी वेदनाशामक औषधे घेऊ नका, कारण यामुळे रक्तस्त्रावाचा धोका वाढू शकतो.

डेंग्यू हा जीवघेणा ठरू शकत असला, तरी वेळेवर उपचार आणि योग्य सजगता राखल्यास या आजाराला सहज रोखता येऊ शकते. आपल्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवा आणि निरोगी राहा, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

बाळासाहेब घुगे
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी जि.प. अकोला

# वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही म्हणून शिक्षण थांबणार नाही!

## सरकार विद्यार्थ्यांना देतंय ६० हजार रुपये

**मुंबई:** उच्च शिक्षण घेण्याची ओढ आहे, मात्र शहरात राहण्याची सोय नाही? किंवा गुणांची टक्केवारी असूनही शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही? अशा विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारची 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' मोठा आधार ठरत आहे. या योजनेद्वारे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि इतर शैक्षणिक खर्चासाठी थेट आर्थिक मदत दिली जाते.

अनेकदा शासकीय वसतिगृहातील जागा मर्यादित असल्याने पात्र असूनही विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारला जातो. अशा वेळी निवास आणि भोजनाच्या सोयीअभावी विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा तिथे न राहता बाहेर राहणाऱ्या विद्यार्थ्यांना ही मदत दिली जाते.

### पात्रतेसाठीच्या अटी

विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे, तो अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध प्रवर्गातील असावा, पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे, विद्यार्थ्याने १० वी मध्ये किमान ५० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे, विद्यार्थी ज्या शहरात शिक्षण घेत आहे, तिथला स्थानिक रहिवासी नसावा.

### योजनेचा लाभ आणि मिळणारी रक्कम

या योजनेंतर्गत मिळणारी रक्कम शहराच्या श्रेणीनुसार ठरवली जाते. तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षाला ३८ हजार रुपयांपर्यंत मदत मिळते. तर महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांना ही मदत ५१ ते ६० हजार रुपयांपर्यंत असू शकते. ही रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यात जमा केली जाते.

### असा करा अर्ज

स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीने अर्ज करावा लागतो. विद्यार्थी ज्या जिल्ह्यात शिक्षण घेत आहे, त्या जिल्ह्याच्या 'समाज कल्याण सहाय्यक आयुक्त' कार्यालयाकडे हा अर्ज सादर करावा. अर्जासोबत १० वी-१२ वीचे मार्कशीट, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला आणि रहिवासी प्रमाणपत्र ही कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे. या योजनेची अधिक माहिती आणि अर्जाचा नमुना https://hmas.mahait.org/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि. १६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात दोन ठार

**♦ सहा प्रवासी गंभीर जखमी, शुक्रवारी रात्रीची घटना**

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** राष्ट्रीय महामार्गावर बोरगाव मंजू पोलिस स्टेशनच्या हद्दीत नवीन बायपास नजीक उभ्या कंटेनरला प्रवासी इको कार पाठीमागून धडकल्याने अपघातात दोन ठार तर सहा प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना १५ मेच्या रात्री घडली. अब्दुल - कुदुस शेख बिरान (७०), मोहम्मद - अरशान मोहम्मद इर्सादि (७) अशी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे समोर आली आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार अकोलाकडे - मुर्तिजापूरकडून जाणारी प्रवासी कार क्रमांक एमएच ३० पी ३७०१ वाडेगावला जात होती. दरम्यान मूर्तिजापूरकडून अकोलाकडे जाणारा मालवाहू कंटेनर क्रमांक आरजे ३० जीबी १००१ हा - राष्ट्रीय महामार्गावर नवीन बायपास नजीक उभा होता. दरम्यान ट्रक



चालकाने आपल्या वाहनाचा अंदाज येईल असे लाईट किंवा दिशादर्शक चिन्ह न लावताच निष्काळजीपणे मालवाहू ट्रक महामार्गावर उभा केला होता. दरम्यान पाठीमागून येणाऱ्या प्रवासी वाहन चालकांच्या समोर उभा असलेला मालवाहू ट्रक उभा असल्याचा अंदाज न आल्याने प्रवासी कार धडकली. या अपघातात कार मधील अब्दुल कुदुस शेख बिरान (७०) तर ७ वर्षीय बालक मोहम्मद अरशान मोहम्मद इर्सादि राहणार वाडेगाव या दोघांचा मृत्यू झाला. तर, कार मधील बिस्मिल्ला बी अब्दुल कुदुस (६०), गुलनाज परवीन शेख महेबुब (४५), मिनाज परवीन मोहम्मद शकील (४०), मुमताज परवीन शेख सलाम (४२) या चार महिलासह चालक मोहम्मद मुसिब गुलाम खाजा (३७), शेख इरफान अब्दुल कुदुस (३२) हे सहा जण गंभीर जखमी झाले. जखमींना रूग्णालयात दाखल केले.

घटनास्थळी बोरगाव मंजूचे पोलिस उपनिरीक्षक मनोज उघडे, हेकॉ संजय भारसाकडे, अमोल मोरे, यांनी घटनास्थळी धाव घेतली. तपास ठाणेदार अनिल गोपाळसह पोलिस करीत आहेत.

## नेहरू पार्कमध्ये सोमवारपासून मोफत ध्यान शिबिर

**अकोला :** स्थानिक नेहरू पार्कचे संचालक बी. एस. देशमुख यांनी १८ ते २५ मे दरम्यान नि:शुल्क ध्यान शिबीर सकाळी ५.४५ ते ७.३० या वेळेत आयोजित केले आहे. शिबीरात योग प्रशिक्षक मनोहर इंगळे योग हे नाथ पध्दतीनुसार व इतर ध्यानाच्या पध्दती शिकवणार आहेत तसेच ध्यानाचे महत्व त्याचा शरीरावर कसा परिणाम होतो ते सांगून सूदर्शन क्रिया करून घेतील. सदर शिबिराचा लाभमनःशांती व मनःशक्ती वाढविणे तसेच स्पर्धा परिक्षे करीता व जिवन कसे जगावे ह्याचा लाभ घ्यावा असे शिवतेज प्रतिष्ठान चे रामप्रकाश मिश्रा, जसवंतसिंग मल्ली, ॲड. वामन चौधरी, बाळासाहेब काळे, पुरुषोत्तम गुप्ता, अनुराधा इंगळे, अरूणा धुमाळे, सरला कागलीवाल, यांनी केले आहे, पाऊस असल्यास शिबीर दूसरे दिवशी चालू राहील. शिबीरात ध्यानाचे आसन प्रत्याकांनी सोबत आणावे, असे आवाहन करण्यात आले.

## अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश अर्जाची मुदत २५ मेपर्यंत

**अकोला :** अकोला, वाशिम व बुलडाणा जिल्ह्यातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळेमध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश देण्याकरिता लाभघेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज मागविण्यात येत आहेत. विनामूल्य अर्ज प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे कार्यालय तसेच नजीकच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेत मिळतील. प्रवेश अर्ज सादर करण्यासाठी अंतिम मुदत २५ मेपर्यंत राहील. प्रवेश अर्जासोबत पालकांचे संमतीपत्र आवश्यक. अर्जासह दोन पासपोर्ट छायाचित्र जोडावीत. विधवा, घटस्फोटित, निराधार, परितत्त्या व दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राधान्य आहे. निवड केलेल्या विदयार्थ्यांला एकदा शाळा निश्चित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थित पालकाच्या व पाल्याच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही.

## वाढत्या तापमानाचा जनजीवनावर परिणाम

**अकोला :** गेल्या काही दिवसापासून अकोला शहरात तसेच परिसरात वाढत्या तापमानाचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. ४५ अंश सेल्सीअसच्या तापमान गेल्याने नागरिकांची पंचाईत झाली आहे.

# उष्माघाताने वृद्धाचा मृत्यू झाल्याची शक्यता

वि प्रतिनिधी १६ मे

**अकोट :** शहरातील नरसिंग मंदिर परिसरातील गणपती मंदिराच्या पाठीमागे शुक्रवारी एका वृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. भाऊराव दौलतराव बेलसरे (वय ८०, रा. वडाळी देशमुख) असे मृत व्यक्तीचे नाव असून ते काही कामानिमित्त अकोट शहरात आले होते.



भर दुपारी रखरखत्या उन्हात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. सुरुवातीला मृत व्यक्तीची ओळख पटली नसल्याने सोशल मीडियावर अनोळखी मृतदेह म्हणून त्यांचा फोटो व्हायरल झाला होता. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते केशवराव बिलबिले यांनी माहिती कुटुंबीयांपर्यंत पोहोचवून ओळख पटविण्यास मदत केली.

प्राथमिक माहितीनुसार, अत्याधिक उष्णतेमुळे म्हणजेच उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात आले.

# अखिल भारतीय छावा संघटनेतर्फे धर्मवीर संभाजी राजेंना मानाचा मुजरा



प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** स्थानिक न्यू तापडिया नगरातील संभाजी राजे उद्यान व येथून जवळच असलेल्या सांगळुद येथे अखिल भारतीय छावा संघटनेतर्फे धर्मवीर संभाजी राजे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या निमित्ताने संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राजे संभाजी उद्यानात एकत्रित येऊन संभाजी राजांच्या पुतळ्याचे पूजन केले व त्यांना मानवंदना अर्पण केली. या जयंतीच्या निमित्ताने वैचारिक सभा घेण्यात येऊन युवकांना मार्गदर्शन करण्यात आले. अ. भा. छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष रणजीत काळे पाटील यांचे मार्गदर्शक विचार व तत्वानुसार अनेक युवकांनी एकत्रित येऊन छत्रपती संभाजी राजांना मानाचा मुजरा दिला याप्रसंगी अ. भा. छावा संघटनेचे प्रदेश अध्यक्ष सुधाकर पाटील, ज्ञानेश्वर गावंडे, विकी पाटील, महेंद्र भगत, राजू शहा, दिनेश पाटील काळे, प्रभाकर राक्षसकार, राम महाराज गवारे, शिवम भालतिलक, मंगेश पाटील, नारायण ऊमाळे, उमेश वि. काळे, बंडू भालतिलक, जितेंद्र पोफळी, उमेश भा. काळे, ज्ञानेश्वर आखतकर, बबनराव कांबरकर, रणजीत गावंडे, करीम शहा, गणेश जाधव, प्रज्वल बोंद्रे, स्वप्निल काळे, सुमित पोफळी, दिलीप भगत, दत्ता काळे, मनवर शहा, ओम काकड यांचे सह इतरही कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

# संघकार्यासाठी आयुष्य वेचणाऱ्या प्रचारकाची प्रेरक जीवनगाथा समाजासमोर - प्रदीप जोशी

**आधुनिक दधीचि' ग्रंथाचे पालकमंत्री ?**
**ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते प्रकाशन**



प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** राष्ट्रकार्य, सेवा, त्याग आणि समर्पण यांचे जिवंत प्रतीक ठरलेले ज्येष्ठ संघ प्रचारक स्व. वसंतराव कसबेकर यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित 'आधुनिक दधीचि' या चरित्रग्रंथाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अ. भा. सह प्रचार प्रमुख प्रदीप जोशी, राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबईच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, विदर्भ प्रांत कार्यवाह प्रा. अतुल मोघे अकोला विभाग संघचालक नरेंद्र देशपांडे, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव गोपाल खंडेलवाल, दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी, आदर्श संस्कार मंडळाचे अध्यक्ष जैनेंद्र लुंकड, सहकार भारती अकोला जिल्हाध्यक्ष रामेश्वर फुंडकर तसेच लेखक सुरेश कुलकर्णी मंचावर उपस्थित होते. या वेळी बोलताना पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर म्हणाले, 'स्व. वसंतराव कसबेकर यांनी कोणतीही साधनसामग्री नसताना आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही राष्ट्रकार्याचा दीप अखंड प्रज्वलित ठेवला. त्यांनी शिक्षण, सहकार, सेवा आणि संघटन या माध्यमांतून अनेक संस्थांची उभारणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत कार्यवाह प्रा. अतुल मोघे होते. प्रमुख वक्ते म्हणून अखिल भारतीय सह प्रचार प्रमुख प्रदीप जोशी यांनी स्व. कसबेकर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, 'संघ प्रचारकांचे जीवन हे राष्ट्रासाठी केलेल्या तपश्चर्येचे प्रतीक असते. स्व. वसंतराव कसबेकर यांनी संघकार्याला अनेक आयाम दिले.कार्यक्रमाची सुरुवात भारतमातेच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर आधुनिक दधीचि ग्रंथ असलेल्या दिंडीचे आगमन झाले आणि वातावरण राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी भारावून गेले. प्रारंभी रामेश्वर फुंडकर यांनी मान्यवरांचा परिचय करून देत स्वागत केले, तर डॉ. निशिकांत देशपांडे यांनी प्रास्ताविकातून ग्रंथनिर्मितीमागील प्रेरणा व स्व. कसबेकर यांच्या कार्याचा आढावा मांडला. यावेळी प. पू. सरसंघचालकांचा प्रेरणादायी संदेश अतुल ठकरे यांनी वाचून दाखविला. कार्यक्रमात स्व. वसंतराव यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या बारा संस्थांच्या प्रतिनिधींचा तसेच ज्येष्ठ स्वयंसेवक, वारकरी मंडळी आणि ग्रंथनिर्मितीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा विशेष सत्कार करण्यात आला. सुनील महाराज कराळे यांच्या हस्ते वारकरी मंडळींचा गौरव करण्यात आला. तसेच ज्येष्ठ स्वयंसेवक सुधाकर जकाते, दत्तात्रय आवदे , रतनलाल खंडेलवाल, नाना कुळकर्णी, भाऊसाहेब नाईकवाडे, दादा पंत, आणि श्रीराम पुंडे यांचा 'आधुनिक दधीचि' ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित संस्थांना स्व. वसंतरावजी कसबेकर यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

रवी कसबेकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. सूत्रसंचालन महेश जोशी यांनी केले. आभार सुरेश कुलकर्णी तर पसायदान पूर्वा गचके यांनी गायीले. मान्यवरांच्या हस्ते 'आधुनिक दधीचि' या ग्रंथाचे औपचारिक प्रकाशन झाले. कार्यक्रमाचे आयोजन स्व. वसंतराव कसबेकर स्मृती संकलन समिती, अकोला यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. रवींद्र भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली रामेश्वर फुंडकर, विनोद देशमुख, डॉ. निशिकांत देशपांडे, समीर थोडगे, राम भिरड, आरती लड्ढा, वैशाली देशपांडे, रवी कसबेकर, संदीप निकम आणि अतुल ठकरे यांनी परिश्रम घेतले.

# रौप्य महोत्सवी सत्ता तरी अकोलेकरांना रोज पाणी नाही, निलेश देव यांचा भाजपवर घणाघात

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** शहर उष्णतेने होरपळत असताना दुसरीकडे भीषण जलसंकटाने नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. ४५ अंशांच्या वर गेलेल्या तापमानात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अशा परिस्थितीत अकोला महानगरपालिकेने १३ मेपासून शहरात चार दिवसाआड म्हणजेच पाचव्या दिवशी, तर हद्दवाढ भागात तब्बल सहाव्या दिवशी पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतल्याने अकोलेकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

याच पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे गटनेते निलेश देव यांनी सत्ताधारी भाजपवर जोरदार हल्लाबोल करत '२५ वर्षे सत्ता भोगूनही अकोलेकरांना रोज पाणी देता आले नाही, तर ही सत्ता जनतेच्या कोणत्या उपयोगाची?' असा थेट सवाल उपस्थित केला आहे. निलेश देव म्हणाले की, 'अकोला महानगरपालिकेच्या स्थापनेला यावर्षी २५ वर्षे पूर्ण होत आहेत. रौप्य महोत्सव साजरा करण्याची भाषा केली जाते; पण नागरिकांच्या घरात पाणी नाही, ही सर्वात मोठी शोकांतिका आहे. भाजपने सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली. महापौर बदलले, चेहरे बदलले, घोषणा बदलल्या; पण अकोलेकरांचे नशिब मात्र बदलले नाही.' महापालिकेकडून काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा कमी झाल्याचे कारण पुढे केले जात आहे. मात्र निलेश देव यांनी यावर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले की, 'महान जलव्यवस्थापन प्रकल्प १९८४ पासून कार्यान्वित आहे. एवढ्या वर्षांत त्याची साठवण क्षमता वाढवण्यासाठी गाळ काढण्याचे मोठे काम का झाले नाही? जुन्या पंपिंग मशीनरीचे आधुनिकीकरण का करण्यात आले नाही? वाढत्या लोकसंख्येचा आणि हद्दवाढ भागांचा विचार करून नवीन जलस्रोत का निर्माण करण्यात आले नाहीत? या प्रश्नांची उत्तरं अकोलेकरांना हवी आहेत.' निलेश देव यांनी जिगाव प्रकल्पाच्या मुद्द्यावरूनही सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, 'गेल्या अनेक वर्षांपासून जिगाव प्रकल्पाच्या नावावर अकोलेकरांना फक्त स्वप्ने दाखवली जात आहेत. प्रत्येक निवडणुकीत, प्रत्येक बैठकीत आणि प्रत्येक पत्रकार परिषदेत जिगाव प्रकल्पाचा गाजावाजा केला जातो; पण प्रत्यक्षात अकोलेकरांच्या नळात पाणी नेमके कधी येणार? याचे स्पष्ट उत्तर आजपर्यंत दिले गेलेले नाही.' नागरिकांचे प्रश्न सुटले नाहीत तर जन आंदोलन उभारू असा इशारा दिला आहे.

# रविवारी दीक्षाभूमी नागपूर येथे 'आठव्या बहुजन परिषदेचे' आयोजन

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने महाराष्ट्रातील संपूर्ण छत्तीसही जिल्ह्यामध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रती जनजागृती निर्माण करण्याकरिता मान्यवर कांशीरामजी यांच्या जयंती पासून सात टप्प्यांमध्ये 'चालत्या फिरत्या आंबेडकर मेळ्याचे' ('आंबेडकर मेळा ऑन व्हील्स' चे) भव्य राज्यव्यापी जनजागृती अभियान यशस्वीरित्या संपन्न झाले हे जनजागृती अभियान राबविताना विविध सात टप्प्यांमध्ये नागपूर, अमरावती, जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहमदनगर, पुणे, रायगड, मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, औरंगाबाद, जालना, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अकोला, वाशिम, बुलढाणा, वर्धा, यवतमाळ, नांदेड,



लातूर, धाराशिव, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, बीड, परभणी व हिंगोली ह्या ३६ जिल्ह्यांमध्ये त्याचप्रमाणे १३१ तहसील मध्ये पोहोचून महाराष्ट्रातील जनमानसामध्ये आंबेडकरवादी चळवळीप्रति जनजागृती निर्माण करण्यात आली. या राज्यव्यापी उपक्रमादरम्यान ४७ दिवसांमध्ये ९२२९ किलोमीटरचा प्रवास करीत ४३० नुक्कड सभा तथा ३४ जाहीर अशा एकूण ४६४ सभा घेण्यात आल्या. सोबतच ३०,००० माहिती पत्रकं वितरित करण्यात आले, ३००० पोस्टर्स चिकटवून, ३००० कॅलेंडर्स चे वितरण सुद्धा संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले आहे. सदर मेळ्याचे समापन दीक्षाभूमी, नागपूर येथे आज रविवार रोजी १७ मे २०२६ ला आठव्या बहुजन परिषदेच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमधील अनेक प्रतिनिधी या परिषदेत उपस्थित राहून वक्तव्य ठेवणार आहेत. सदर परिषदेस महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी आणि प्रतिनिधींनी उपस्थित रहावे असे आवाहन 'कहीं हम भूल न जायें' अभियानाचे ॲड. अतुल पाटील यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळांच्या सक्षमीकरणासाठी लोकप्रतिनिधी व लोकसहभागाची गरज

पुरुषोत्तम निमकर्डे १६ मे

**अडगांव बु. :** गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हणजे संस्कारांचे आणि शिक्षणाचे पवित्र मंदिर. नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले की शाळेत प्रवेश घेण्यासाठी पालकांची मोठी गर्दी व्हायची. पटसंख्या एवढी की तीन तीन तुकड्या असायच्या. मात्र, काळाच्या ओघात हे चित्र पूर्णपणे बदलले असून,खाजगी कॉन्हेट संस्कृती च्या वाढत्या स्पर्धेत जिल्हा परिषद शाळांना पटसंख्या टिकवून ठेवण्यासाठी शाळा आणि शिक्षकांना संघर्ष करावा लागत आहे. येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा त्यापैकी च एक असुन वार्षिक परीक्षा संपण्यापूर्वीच इयत्ता पहिल्या वर्गाकरीता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. खासगी शाळा पैक्षाही आता महाराष्ट्र शासनाने मागील वर्षापासून जि.प.प्राथमिक शाळेत सिबीएससी इंग्रजी माध्यमातून मोफत दर्जेदार शिक्षण सुरु केले असल्याने याचा फायदा



गावातील विद्यार्थ्यांना व्हावा म्हणून जि.प.शाळेचे शिक्षक घरोघरी जाऊन पालकांचे समुपदेशन करत आहेत.शालेय उपयोगी साहित्य, अनुभवी शिक्षक, सुसज्ज वर्गखोल्या, आणि कॉलरशीप, नवोदय, परीक्षा विविध शासकीय योजनांची माहिती ते देत आहेत. तर एकीकडे खाजगी कॉन्हेट शाळेचे शिक्षक सुध्दा गावातील पालकाच्या भेटी गाठी घेवुन हजारो रुपये वार्षिक फि असलेले शिक्षणाचे महत्त्व पटवून देत आहेत.तरी सुध्दा अनेक पालक केवळ प्रतिष्ठेपोटी खाजगी शाळांची वाट धरत आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये सध्या प्रामुख्याने शेतमजूर आणि सामान्य कुटुंबातील मुलेच उरली आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. जिल्हा परिषद शाळांची ढासळती कळा थांबवायची असेल, तर केवळ शिक्षकांवर विसंबून राहून चालणार नाही. त्यासाठी गावातील नागरिक, सामाजिक संघटना यांनी पुढे येवुन भर देणे गरजेचे आहे गांवकऱ्यांनी शाळेच्या भौतिक सुविधांसाठी मदतीचा हात देवुन सामाजिक संघटनांनी जि.प.शाळेतील शिक्षणाचे महत्त्व आणि शाळांमधील गुणवत्ता पालकांपर्यंत पोहोचवणे.आपल्या गावातील मुलगा आपल्याच गावच्या शाळेत शिकेल, असा निश्चय ग्रामस्थांनी करण्याची गरज आहे. जिल्हा परिषद शाळा या केवळ इमारती नसून गावांचा अभिमान आहेत. थोर महात्म्यांनी सर्वासाठी शिक्षणाची कवाडे विनामुल्य उघडली असतांनाही विकत शिक्षण घेण्याचा कल वाढला आहे. यांचा परीनाम थेट जिल्हा परिषद शाळेच्या पटसंख्यावर होत आहे. ग्रामीण भागातील बुद्धिमत्ता घडवण्याचे काम याच शाळांनी केले आहे. आजही सरळ सेवा भरती,पोलीस भरती ,देशसेवेत सिमेवर याच जि.प.विद्यार्थ्यांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे, आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात या शाळांना मागे पडू न देता, गावकऱ्यांनी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन 'आपली शाळा' वाचवण्यासाठी पुढाकार घेण्याची हीच खरी वेळ आहे.



# ‘कृषी’चा खत माफियावर छापा

## ७०० गोण्या जिप्सम पावडर जप्त

प्रतिनिधी १६ मे

**यवतमाळ:** उमरखेड तालुक्यातील ढाणकी येथे कृषी विभागाने अनधिकृत खत साठ्यावर मोठी कारवाई करत संशयास्पद जिप्सम पावडरचा मोठा साठा जप्त केला. गोपनीय माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून संबंधितांविरोधात पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

१४ मे रोजी कृषी विभागाला ढाणकी परिसरात एका ट्रकमधून संशयास्पद खत वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन ट्रकची तपासणी केली. तपासणीदरम्यान ‘HMM Industries, बिकानेर’ उत्पादित आणि ‘आर्य केमिकल्स अँड मिनरल इंडस्ट्रीज, नागोर’ यांच्या बिलावरील जिप्सम पावडरचा मोठा साठा आढळून आला.

ट्रकमध्ये ५० किलो वजनाच्या तब्बल ७०० गोण्या असल्याचे स्पष्ट झाले. अधिकाऱ्यांनी संपूर्ण माल जप्त करून पुढील चौकशी सुरू केली आहे. या कारवाईत मोहीम अधिकारी प्रविण



जाधव, कृषी अधिकारी राजेंद्र डांगारे, संजय गुज्जलवार तसेच भारत चेके यांनी सहभाग घेतला. पोलिसांच्या उपस्थितीत पंचनामा करण्यात आला असून संबंधित कागदपत्रांचीही तपासणी करण्यात येत आहे. कृषी विभागाच्या प्राथमिक तपासात संबंधित साठा अधिकृत परवानगीशिवाय ठेवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या जिप्सम पावडरचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार असून अहवालानंतर पुढील कारवाई होणार आहे. खरीप हंगाम तोंडावर असताना बनावट व निकृष्ट खतांविरोधात कृषी विभागाने विशेष मोहीम सुरू केली असून जिल्ह्यात अशा प्रकारच्या कारवायांना वेग देण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# ३० मेपर्यंत पेट्रोल पंप हटवा; अन्यथा १ जूनला जनआक्रोश आंदोलन

प्रतिनिधी १६ मे

**उमरखेड :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सौंदर्यकरणाला अडथळा ठरत असलेला भारत पेट्रोल पंप ३० मेपूर्वी हटवावा, अन्यथा १ जून रोजी हजारो शिवप्रेमींसह जनआक्रोश आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समिती, जिजाऊ ब्रिगेड व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने देण्यात आला. शुक्रवारी (१५ मे) येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत हा इशारा देण्यात आला.

पत्रकार परिषदेला जिजाऊ ब्रिगेडच्या सरोजताई देशमुख, कृती समितीचे अध्यक्ष भैय्या पवार, चक्रधर देवसरकर, स्वप्निल कनवाळे, गुलाब सूर्यवंशी, यशोदा सोनटक्के, विद्वान केवटे, प्रवीण गादेकर, गोपाल झाडे, विजय चौधरी, शुभम माने, बसवेश्वर शिरसागर,



प्रवीण देशपांडे, दिनेश रावते, चांदराव सुरोशे, अरुण ठाकरे आणि निखिल थोरात उपस्थित होते.

गेल्या दहा वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रश्नावर केवळ राजकारण सुरू असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलन, उपोषण, मोर्चे, निवेदने आणि तुरुंगवास भोगूनही प्रशासनाने पेट्रोल पंप हटविण्याबाबत कोणतीही भूमिका घेतली नसल्याचे सांगण्यात आले. उलट जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित पेट्रोल पंपाची लीज आणखी पाच वर्षांसाठी वाढविल्याने शिवप्रेमींमध्ये संताप व्यक्त करण्यात आला.

सरोजताई देशमुख यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींवर टीका करत, “मोठमोठी आंदोलने, उपोषणे आणि मोर्चे होऊनही पेट्रोल पंपाची लीज वाढविलीच कशी?” असा सवाल उपस्थित केला. भैय्या पवार यांनी पेट्रोल पंपाची लीज वाढविताना आर्थिक व्यवहार झाला आहे का, याची चौकशी करण्याची मागणी केली. विद्वान केवटे यांनी संबंधितांवर भारतीय दंड संहितेतील कलम १५३-अ व २९५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची मागणी केली.

“जोपर्यंत महाराजांच्या पुतळ्यासमोरील अडथळा दूर होत नाही, तोपर्यंत पुतळ्याचे अनावरण होऊ दिले जाणार नाही,” अशी भूमिका शिवप्रेमींनी पत्रकार परिषदेत मांडली.

# कृषीपंप वीज जोडणीत विलंब; महावितरणवर दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी १६ मे

**महागाव :** कृषीपंपासाठी वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबामुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने महावितरणविरोधात दंडात्मक आदेश दिले आहेत. कासोळा येथील शेतकरी देवराव शिवा पाईकराव यांनी तक्रार केली होती. देवराव पाईकराव यांनी कृषीपंपासाठी वीज जोडणी मिळावी यासाठी १ जानेवारी २०२१ रोजी अर्ज केला होता. मात्र, दोन वर्षांहून अधिक काळ उलटल्यानंतर ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी त्यांच्याकडून १४ हजार ३९३ रुपयांचे कोटेशन भरून घेण्यात आले. तरीही प्रत्यक्ष वीज जोडणी देण्यात आली नसल्याने त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागला.

शेतात मुबलक पाणी उपलब्ध असतानाही विजेअभावी पिकांना पाणी देता आले नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानामुळे पाईकराव यांनी १२ सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, यवतमाळ येथे ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत तक्रार दाखल केली होती.

प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान भारतीय वीज कायदा २००३ मधील कलम ४३ नुसार अर्जदाराला ३० दिवसांच्या आत वीज पुरवठा देणे बंधनकारक असल्याचे आयोगाने नमूद केले. मात्र संबंधित शेतकऱ्याला दीर्घकाळ वीज जोडणी न दिल्याने ग्राहक सेवेत कसूर तसेच अनुचित व्यापार पद्धतीचा अवलंब झाल्याचे आयोगाने स्पष्ट केले. आयोगाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र मराठे आणि सदस्या मनीषा वनमोरे यांच्या समोर झालेल्या सुनावणीत महावितरणला ३१ ऑक्टोबर २०२३ पासून प्रत्यक्ष कृषी वीज पुरवठा मिळेपर्यंत प्रति दिवस २०० रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. दरम्यान, आयोगाच्या निर्णयाबाबत शेतकरी देवराव पाईकराव यांनी नाराजी व्यक्त केली आहे. “वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे पाणी असूनही शेती पिकांना पाणी देता आले नाही. सुमारे साडेतीन हजार फूट पाइपलाइन टाकण्यासाठी जवळपास चार लाख रुपये खर्च केले. मात्र विजेअभावी त्याचा कोणताही उपयोग झाला नाही. मागील तीन हंगामात अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे या निर्णयाविरोधात अपील करणार आहे,” असे त्यांनी सांगितले.

# वीजतार तुटून दोन म्हशींचा मृत्यू

प्रतिनिधी १६ मे

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील पार्डी (चुरमुरा) शिवारात गोठ्यावरील प्रवाहित वीजतार तुटून पत्र्याच्या छपरावर पडल्याने विजेचा धक्का बसून दोन दुभत्या म्हशींचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (१५ मे) सकाळी घडली. या दुर्घटनेत शेतकरी सत्तू कोठु जाधव यांचे सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

पार्डी शिवारातील गट क्रमांक ६०/१ मधील शेतकरी सत्तू जाधव यांनी आपल्या दोन म्हशी गोठ्यात बांधल्या होत्या. विहिरीवरील इलेक्ट्रिक कनेक्शनमधून गोठ्याला वीजपुरवठा करण्यात आला होता.

बुधवारी (१४ मे) रात्री जनावरे नेहमीप्रमाणे गोठ्यात बांधण्यात आली होती. मात्र, गुरुवारी पहाटे गोठ्यावरील विजेची तार तुटून ती पत्र्याच्या छपरावर पडली. त्यामुळे संपूर्ण पत्र्यामध्ये वीजप्रवाह उतरला.

सकाळी सुमारे सहा वाजताच्या सुमारास जाधव हे गोठ्यात गेले असता त्यांनाही विजेचा धक्का बसून ते दूर फेकले गेले. त्यानंतर गोठ्यातील दोन्ही म्हशी मृतावस्थेत आढळून आल्या. मृत जनावरांमध्ये सुमारे सात वर्षांची पांढऱ्या रंगाची म्हैस व पाच वर्षांची मुऱ्हा जातीची म्हैस होती. दोन्ही म्हशींची किंमत प्रत्येकी सव्वा लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

या प्रकरणी सत्तू जाधव यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. प्रशासनाकडून घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून मृत जनावरांचे शवविच्छेदनही करण्यात आले. दोन दुभत्या म्हशी दगावल्याने जाधव कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर मोठा परिणाम झाला आहे.

# व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील कमेंटवरून वाद; जीवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी १६ मे

**आर्णी :** सोशल मीडियावरील व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये करण्यात आलेल्या कमेंटच्या वादातून एका व्यक्तीस शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना आर्णी येथे उघडकीस आली आहे. याप्रकरणी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिसोदिया लेआऊट परिसरातील रहिवासी मनोज सोनबाजी माघाडे (वय ३६) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, १४ मे २०२६ रोजी मध्यरात्री १.१३ वाजण्याच्या सुमारास शास्त्रीनगर येथील जुनैद रफिक शेख (वय ३५) याने एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील पोस्टवर आक्षेपार्ह कमेंट केली. संबंधित कमेंटमध्ये पत्रकारांविषयी अवमानकारक शब्दांचा वापर करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीनुसार, या कमेंटनंतर काही वेळातच संबंधिताने मोबाईलवर संपर्क साधत व्हॉट्सअ‍ॅप कॉलद्वारे धमकी दिली. तसेच शिवीगाळ करत “तुला पाहून घेतो” अशा स्वरूपाची दमदाटी करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक व्यासपीठावर बदनामीकारक वक्तव्ये केल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणात फिर्यादीकडे व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील स्क्रीनशॉट तसेच ऑडिओ क्लिप स्वरूपातील पुरावे उपलब्ध असून ते पोलिसांकडे सादर करण्यात आले आहेत. पोलिसांनी तक्रारीची नोंद घेत भारतीय न्याय संहिता कलम २९६, ३५२, ३५१(२) आणि ३५१(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी नफीस शेख करीत आहेत.

# भाजपा जिल्हाध्यक्षांच्या कारला धडक

प्रतिनिधी १६ मे

**दिग्रस :** दिग्रसपासून सुमारे ३ किलोमीटर अंतरावर असलेल्या देऊरवाडा परिसरात शुक्रवार, १५ मे रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास पुसद जिल्हा भाजपाच्या जिल्हाध्यक्षा डॉ. आरती फुपाटे यांच्या इनोव्हा कारला एका भरधाव कारने धडक देऊन चालकाने पलायन केल्याची घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, डॉ. फुपाटे या आपल्या एमएच २९ एआर १००० क्रमांकाच्या इनोव्हा कारने यवतमाळहून दिग्रस मार्गे पुसदकडे जात होत्या. त्यावेळी देऊरवाडा गावाकडून येणाऱ्या एमएच ४६ सीव्ही ६६३१ क्रमांकाच्या कारच्या चालकाने समोरच्या वाहनाचा अंदाज न घेतल्याने त्यांच्या कारला जोरदार धडक दिली. या अपघातात इनोव्हा कारच्या डाव्या बाजूच्या दोन्ही दरवाजांचे मोठे नुकसान झाले. धडक दिल्यानंतर संबंधित कारचालक घटनास्थळावरून पसार झाला. या प्रकरणी दिग्रस पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास ठाणेदार डॉ. तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.



# विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलमध्ये अत्याधुनिक ‘पोदार स्पोर्ट्स झोन’चे उद्घाटन

प्रतिनिधी १६ मे

**पुसद :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबत क्रीडेलाही समान महत्त्व देण्याच्या उद्देशाने विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलमध्ये अत्याधुनिक ‘पोदार स्पोर्ट्स झोन’चे उद्घाटन उत्साहात करण्यात आले. स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून गुरुवारी आयोजित कार्यक्रमात विविध मान्यवरांच्या हस्ते क्रीडा संकुलाचे लोकार्पण करण्यात आले.

संस्थेच्या संचालकांच्या मातोश्री सौ. शंकुतला अप्पाराव मैंद, सौ. शोभा अनिलराव डुबेवार, श्रीमती विमल गोपालदास अग्रवाल, श्रीमती माधुरी मनोहरराव अनंतवार, श्रीमती शंकुतला शंकरराव सोमावार तसेच श्री अनिल डुबेवार यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली.

सुमारे ३० हजार चौरस फूट



क्षेत्रात उभारण्यात आलेल्या या स्पोर्ट्स झोनमध्ये क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, पिकल बॉल आणि किड्स प्ले एरियासह विविध मैदानी खेळांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञान लक्षात घेऊन उभारण्यात आलेल्या या क्रीडा संकुलामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार प्रशिक्षण व सरावाची संधी उपलब्ध होणार आहे. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी क्रीडांगणांचे महत्त्व अधोरेखित केले. “ज्ञान, संस्कार आणि क्रीडा यांचा संगम” ही संकल्पना प्रत्यक्षात साकारत विद्यालयाने पुसद शहरात आधुनिक क्रीडा सुविधांची नवी ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्गार यावेळी काढण्यात आले. कार्यक्रमादरम्यान आर्किटेक्चर साई डुबेवार यांच्या वतीने त्यांचे काका श्री व सौ. सुनील डुबेवार तसेच स्पोर्ट्स झोनच्या उभारणीत सहकार्य करणाऱ्या डीजे अरेनाचे संचालक देव विजय जाधव यांच्या वतीने त्यांचे पालक श्री व सौ. विजय जाधव आणि युवक मंडळ पुसदच्या सचिवांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, नागरिक आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे संचालक शरद मैंद, सुरज डुबेवार, संतोष अग्रवाल, मनिष अनंतवार आणि संगमनाथ सोमावार यांनी केले. प्राचार्या डी. राधा, एडमिन ऑफिसर गोविंद निमडगे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# ३ हजार ७०४ नागरिकांना प्रमाणपत्रांचे वाटप

## कळंब येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’

प्रतिनिधी १६ मे

**कळंब :** महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने कळंब येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरा’चे आयोजन करण्यात आले होते. राळेगाव चौफुली परिसरातील रॉयल पॅलेस येथे शुक्रवारी सकाळी दहा वाजता झालेल्या या शिबिरात तब्बल ३ हजार ७०४ नागरिकांना विविध विषयांवरील प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

महसूल विभागाच्या पुढाकारातून राज्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या दैनंदिन प्रश्नांचे तातडीने निराकरण करण्यासाठी मंडळस्तरावर हे अभियान राबविण्यात येत आहे. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत ‘गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण’ मोहिमेच्या अनुषंगाने कळंब येथे तालुकास्तरीय शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी चिंतामणी मंदिर आणि इंदिरा चौकातून जनजागृती रॅली काढण्यात आली. शिबिराच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष सिद्दिकी मॅडम व उपनगराध्यक्ष आकाश कुठे-माटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून दत्तापूर, वाढोणा खुर्द, मलकापूर आणि शरद



येथील सरपंच उपस्थित होते. तहसीलदार धीरज स्थूल, नायब तहसीलदार अभय देशपांडे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी धुमाळ, पुरवठा निरीक्षक मनोहर, भूमी अभिलेख अधिकारी नाले, सहाय्यक निबंधक सौ. गायकवाड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. औपचारिक उद्घाटनानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. तहसीलदार धीरज स्थूल यांनी शिबिराची प्रस्तावना मांडली. काही लाभार्थ्यांना मंचावर प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले, तर विविध योजनांअंतर्गत धनादेश व साहित्यही वितरित करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या महत्त्वावर आधारित नृत्य सादर केले. तसेच एका चिमुकल्या विद्यार्थिनीच्या नृत्याने उपस्थितांची दाद मिळवली. शिबिरात २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिरात महसूल विभागासह जिल्हा मध्यवर्ती बँक, वनविभाग, पशुसंवर्धन विभाग, आरोग्य विभाग, कौशल्य व उद्योजकता विभाग, सहकार विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, भूमी अभिलेख, समाजकल्याण, कामगार, महिला व बालविकास, कृषी विभाग, नगरपंचायत आणि ग्रामविकास विभाग आदींचे माहितीपर स्टॉल लावण्यात आले होते. प्रमुख पाहुणे आणि अधिकाऱ्यांनी विविध स्टॉलना भेट देऊन माहिती घेतली. विशेषतः महिला व बालविकास विभागाच्या प्रदर्शनातील अन्नपदार्थांची पाहणी करून त्याविषयी माहिती जाणून घेतली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी अनिल सुरपाम, ग्राम महसूल अधिकारी अंकित उमरतकर, सुहास शिंदे, शाम शेलोकार, राजेश ताकसांडे, कुमारी रूपाली मानेकर तसेच तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# आइडियल संस्थेच्या तिन्ही शाळांनी राखली उज्वल निकालाची परंपरा

प्रतिनिधी १६ मे

**आर्णी :** आयडियल एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित आर्णी, ढाणकी व यवतमाळ येथील तिन्ही उर्दू हायस्कूलांनी यंदाच्या दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. ढाणकी येथील हनिफ मास्टर उर्दू हायस्कूलचा निकाल शंभर टक्के लागला असून कु. शिफा मरियम शेख यासीन हिने 92.80 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

शेख मावान शेख इरफान (90.40%) द्वितीय तर अलिझा सैयद फिरोज (90.20%) तृतीय क्रमांकावर राहिली. या शाळेतून एकूण 56 विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी 18 विद्यार्थी विशेष प्राविण्य, 20 विद्यार्थी



प्रथम श्रेणी तर 18 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. यवतमाळ येथील उर्दू हायस्कूल, पोबारु लेआउटचा निकालही शंभर टक्के लागला. फैझा कौनैन नदीम खान हिने 86.80% गुण मिळवत प्रथम स्थान मिळवले. तैय्यबा सनोबर अय्युब खान (86.20%) द्वितीय तर अल्फिया फिरदौस शेख जावेद (85.40%) तृतीय क्रमांकावर राहिली. दरम्यान, आर्णी येथील बाबा कंबलपोष उर्दू हायस्कूलचा निकाल 95.23% लागला. कु. नुरल सबा सैयद हफीज हिने 87.20% गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. आलिया साजिद मलनस (75.80%) द्वितीय तर लायबा परवीन शेख आरिफ (70.60%) हिने तृतीय क्रमांक पटकावला. आयडियल एज्युकेशन सोसायटीच्या तिन्ही शाळा शैक्षणिक निकालाबरोबरच विविध उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेत आहेत. यावर्षी यवतमाळ व ढाणकी येथील शाळांनी जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवला असून 'इन्स्पायर अवॉर्ड'साठीही त्यांची निवड झाली आहे. दहावीच्या परीक्षेत यश संपादन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष सैयद मकसूद अली पटेल यांनी अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पुसद जि.यवतमाळ यांचे कार्यालय**

**जाहीरनामा**

एम.आर.सी. 81/131/2026
तहसिल कार्यालय, पुसद
दिनांक : 26/2/2026

आवेदक :- श्री./सौ. शेख अमीन शेख रजाक रा. इसापूर धरण ता. पुसद, यवतमाळ.
अनावेदक :- मुख्याधिकारी नगर परिषद, पुसद / सचिव, ग्राम पंचायत, इसापुर धरण ता.पुसद, जि. यवतमाळ

ज्याअर्थी अर्जदार नामे श्री. सौ. शेख अमीन शेख रजाक, रा. ईसापुर धरण ता. पुसद, जि. यवतमाळ. यांनी त्यांचे स्वतः नामे श्री/सौ./श्रीमती, शेख अमीन शेख रजाक रा. ईसापुर धरण यांच्या जन्माची नोंद न्यायालयीन जन्म-मृत्यू नोंदणी कायद्याचे कलम 13. प्रमाणे घेण्याकरीता दिनांक 26/02/2026 रोजी अर्ज सादर केला असून दिनांक 01/07/1985 रोजी त्यांचा जन्म त्यांच्या राहत्या घरी मौजा ईसापुर धरण ता. पुसद जि. यवतमाळ येथे झाला आहे, या बाबत यांच्या नावाची जन्म नोंद नगर परिषद, पुसद / सचिव, ग्राम पंचायत इसापूर धरण ता. पुसद जि. यवतमाळ यांना. घेण्याकरीता आदेश देण्यात येईल असे नमुद केले आहे. याकरीता एम.आर.सी. 81/131/2026 तहसिल कार्यालय, पुसदच्या वतीने, नगर परिषद, पुसद / सविव ग्रामपंचायत इसापूर धरण ता. पुसद जि. यवतमाळ यांना प्रसिध्दी करीता जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

त्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार नामे, श्री शेख अमिन शेख रजाक रा. इसापूर धरण ता. पुसद जि. यवतमाळ यांनी त्यांचे (नाते) स्वतः नामे श्री/ सौ शेख अमिन रा. इसापूर धरण ता. पुसद यांचा जन्म नोंदणी बाबत कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असेल तर त्यांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झाल्या पासून 15 दिवसाच्या आंत या कार्यालयात आपण स्वतः अगर आपल्या वकिला मार्फत हजर राहुन आपली हरकत अथक आक्षेप लेखी स्वरुपात नोंदवावा, अन्यथा कोणालाही काहीही सांगवयाचे नाही असे गृहित धरुन सदरहु अंर्जदाराचा अर्ज निकाली काढण्यात येवुन त्यांना जन्म नोंद मिळणे या बाबतचे आदेश पारीत करण्यात येईल. यांची नोंद घ्यावी. सदर जाहीरनामा दिनांक 14/05/2026 रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(शिक्का)

**स्वा./-**
**तहसिलदार, पुसद**

**नगर परिषद कार्यालय उमरखेड जि. यवतमाळ**
**आरोग्य विभाग (दरपत्रक) दुसरी वेळ**

नगर परिषद अधीनस्त आरोग्य विभागा करीता खालील कामे करावयाची आहे. या करीता सक्षम पुरवठादार किंवा दुकानदार यांनी आपले दरपत्रक व्दी लिफाफा पध्दतीने सादर करावे. या करीता नगर परिषदेन प्रपत्र तयार केले असुन ते दिनांक 16/5/2026 ते 20/5/2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत न.प.चे आरोग्य विभागात मिळु शकतील सदर सिलबंद दरपत्रक न.प. चे भांडार विभागात अनामत रक्कमेचा भरणा दिनांक 21/5/2026 रोजी कार्यालयीन वेळेत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नांव | कोर प्रपत्र किंमत | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | आरोग्य विभागामधील टॅक्टर क्रमाक एच 29 ए के 1945 चे करीता नांमाकिंत कंपनीचे हेड चे 2 समोरचे व मागचे टायर पुरवठा करणे. | 50/- | 500/- |
| 2 | आरोग्य विभागामधील 6 फॉगिंग मशीन रिपेंरीग व सव्हीसींग करणे. | 50/- | 500/- |
| 3 | आरोग्य विभागामधील ट्रॅक्टर एम एच29 सी 3383 व टॅक्टर कंमाक एम एच 29 व्ही 2131 ट्रॉली रिपेरिग व कलरिंग करणे बाबत. | 50/- | 500/- |
| 4 | न.प. अधीनस्त कार्यालय व शाळे करीता डस्टबिन पुरवठा करणे बाबत. | 50/- | 500/- |
| 5 | आरोग्य विभागामधील टॅक्टर कंमाक एम एच 29 व्ही 2131 हेड रिपेरिग करणे बाबत. | 50/- | 500/- |

सदर सर्व कामाच्या अटी व शर्ती प्रपत्रासोबत उपलब्ध करूण दिल्या आहेत. व कार्यालयीन वेळेस आरोग्य विभागात पहावयास मिळतील.

**स्वा./-** स्वच्छता निरिक्षक, नगर परिषद उमरखेड
**स्वा./-** लेखापाल, नगर परिषद उमरखेड
**स्वा./-** मुख्याधिकारी, नगर परिषद उमरखेड

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. १६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या ‘व्हॉट्सअॅप चॅटबॉट’ सेवेचा शुभारंभ

**अमरावती:** अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक तसेच गट कर्ज योजनांतील लाभार्थ्यांना अधिक सुलभ, पारदर्शक व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ‘व्हॉट्सअॅप चॅटबॉट’ सेवा सुरू करण्यात आली आहे. "One Clicked Information" या विशेष संकल्पनेअंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या सुविधेमुळे आता लाभार्थ्यांना त्यांच्या अर्जासंबंधित संपूर्ण माहिती आणि विविध प्रक्रियांची सद्यस्थिती थेट व्हॉट्सअॅपवर तत्काळ प्राप्त होणार आहे. या अत्याधुनिक सुविधेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी ८९७६८५५९२१ या क्रमांकावर ठप्प असे लिहून पाठवायचे आहे. हा मेसेज पाठवताच लाभार्थ्यांसमोर एक मेनू उपलब्ध होईल, ज्यामध्ये महामंडळ व योजनांची माहिती, नवीन नोंदणी संदर्भातील मार्गदर्शन, पात्रता प्रमाणपत्र स्थिती व ते डाउनलोड करण्याची सुविधा, बँक कर्ज मंजुरी स्थिती आणि व्याज परतावा दावा स्थिती यासारखे पर्याय मिळतील.

# विद्युत विभागाच्या जिल्ह्यातील प्रलंबित कामांवर आ. रवी राणा संतप्त

**◆ अधिकाऱ्यांना दिली शेवटची ताकीद ◆ सबडिव्हिजन विभाजन, जारीदा कव्हर कंडक्टर विद्युत वाहिनी चा २० कोटी चा प्रस्ताव मां. मुख्यमंत्री यांना पाठवावा- आ. रवी राणा**

प्रतिनिधी १६ मे

**अमरावती:** अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली अमरावती शहर व ग्रामीण विभागातील विविध प्रलंबित समस्या, विद्युत पुरवठा तसेच शेतकरी हिताच्या कामांचा आढावा घेण्यासाठी विद्युत भवन येथील जिल्हा कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत पावसाळ्यापूर्वी सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याच्या निर्णय घेऊन ती तातडीने करण्याच्या सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.



बैठकीदरम्यान उपस्थित उप महापौर व नगरसेवांच्या समस्या ऐकून घेऊन शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, मानवी वस्त्यांमधील धोकादायक विद्युत तारा त्वरित दुरुस्त करणे, शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना नियमित वीजपुरवठा देणे तसेच विविध विकासकामे वेगाने पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात. आली. यावेळी अधिकाऱ्यांना आमदार रवी राणा यांनी कडक शब्दांत शेवटची ताकीद देत, बैठकीत घेतलेले निर्णय वेळेत पूर्ण करा, अन्यथा कामचुकारपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा दिला.

बैठकीत मनपा परिसर व अमरावती, भातकुली, अचलपूर, तिवसा, दर्यापूर, चिखलदर, धारणी, मोर्शी, आदी तालुक्यांतील विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सौर ऊर्जा कृषी पंप योजना, नवीन रोहित्र बसविणे, विद्युत वाहिन्या टाकणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, प्रधानमंत्री मुक्त बिजली योजना तसेच पीएसपी अंतर्गत मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना अध्यक्ष रवी राणा यांच्याकडून देण्यात आल्या.

याशिवाय उपकेंद्र उभारणी करणे आदी कामे, जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत मंजूर विकासकामे तसेच शहर व ग्रामीण भागातील विद्युत पुरवठा सुरळीत करण्यावर विशेष भर देण्यात आला. सब डिव्हिजनचे विभाजन व मनुष्य बळ पदे मान्यता देण्यासाठी बैठकीतून आ.रवी राणा यांनी सचिन तालेवार संचालक प्रोजेक्ट, ऑपरेशन यांच्या सोबत बोलून मान्यता करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली असून, यासाठी लवकरच शासन स्तरावर मान्यता मिळणार असल्याची माहिती आमदार रवी राणा यांचे कडून देण्यात आली.

बैठकीला मनपा उपमहापौर सचिन भेंडे, नवनिर्वाचित नगरसेवक, युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीस महावितरणतर्फे खालील अधिकारी उपस्थित होते. दिपाली मडेलवार अधीक्षक अभियंता पायाभूत आराखडा अमरावती परिमंडळ, अमित शिवलकर कार्यकारी अभियंता प्रशासन तथा प्रभारी अधीक्षक अभियंता अमरावती मंडळ, प्रफुल्ल लांडे, कार्यकारी अभियंता अमरावती ग्रामीण विभाग राजेश घाटोळे, कार्यकारी अभियंता अमरावती शहर विभाग, प्रदीप अंधारे, कार्यकारी अभियंता अचलपूर विभाग, विजय कासट, कार्यकारी अभियंता मोर्शी विभाग

सागर नाईक, उपकार्यकारी अभियंता ग्रामीण उपविभाग अमरावती, जयंत घाटे उपकार्यकारी अभियंता बडनेरा ग्रामीण उपविभाग दीपक भोंडे उपकार्यकारी अभियंता भातकुली उपविभाग राहुल सांबारे, सहाय्यक अभियंता रहाटगाव, अंकुश सोनोणे, सहाय्यक अभियंता अंजनगाव बारी, सुदाम पागधने, सहायक अभियंता लोणी टाकडी अमोल सावळे, सहाय्यक अभियंता, पायाभूत आराखडा अमरावती ग्रामीण विभाग सुधीर वानखडे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता शहर उपविभाग- बिपिन श्रीराव अतिरिक्त कार्यकारी अभियंता शर उपविभाग, प्रितेश मोखाडे, प्रभारी अतिरिक्त कार्यकारी अभियंता शहर उपविभाग २ प्रशांत कांबळे, सहाय्यक अभियंता बडनेरा जुनी वस्तीनिलेश साबरे, सहाय्यक अभियंता, नवाथे नगर १९) श्री. विशाल वानखडे, सहाय्यक अभियंता, रुक्मिणी नगर व वडाळी अरविंद बोंद्रे, सहाय्यक अभियंता, शहर उपविभाग ३ बैठकीत उपमहापौर श्री.सचिन भेंडे, गटनेते श्री.नाना आमले, शिक्षण सभापती अॅड. सौ.प्रिती हर्षल रेवणे, नगरसेवक श्री.किशोर जाधव, श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक श्री.अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक श्री.दिपक किसनलाल साहु, नगरसेवक श्रीमती नंदा धनंजय सावदे, नगरसेवक सौ.रजनी राजेश डोंगरे, नगरसेवक सौ.गौरी शैलेंद्र मेघवानी, नगरसेवक श्री.महेश धनराज मुलचंदानी, नगरसेवक श्री.योगेश रघुनाथ विजयकर, नगरसेवक सौ.अर्चना अशोक पांडे, नगरसेवक सौ.प्रियंका भुषण पाटणे, नगरसेवक श्रीमती मिराताई कांबळे, नगरसेवक सौ.मधुरा मिलींद कहाळे, नंदेश अंबाडकर, नगरसेवक सजय गवाडे, नगरसेविका मधुरा कहाळे, उमेश ढोणे खाजगी सचिव, आशिष कावरे, बंडू डकरे, नितीन बोरेकर, आशिष गावंडे, कुशल गोडाणे, अशोक पांडे, भूषण पाटणे, घनश्याम डकरे, गजानन सावंत, महेश किल्लेकर, मिलिंद काहाडे, नीरज गवई, पद्माकर गुल्हाने, अतुल झंजाळ, राजू तेलमोरे, मकसूद भाई, शंफू पठाण, उद्धवराव कराळे, ओंकार मोहोळ, गणेश सूरदशे, भीमराव गडलीग, मंगेश चव्हाण, शैलेश मेघवानी, किरण अंबाडकर, बंडू जाधव, शरद केवतकर, वंदना जामनेर, संदीप कांबळे, उदय पर्वतकर, कुणाल केवतकर, अश्विन ऊके, पराग चिमोटे, प्रवीण धुरटकर, सोनाली नवले, अवी काळे, छोटू आकोटकर, किशोर पीवाल, गणेशदास गायकवाड, पंकज गोहत्रे, गोलू राऊत, वनिता तंतरपाडे, राजेश तरडेजा, धीरज केने, पवन हिंगणे, संदेश मेश्राम, अभी निमकर, सौरभ कोहळे, देवानंद राठोड, अंकुश आडे, वैभव गोसावी, सद्दाम हुसेन, सचिन बोंडे, पंकज सुरडकर, पांडुरंग खंडारे, राजेंद्र तांबस्कर, शेख कयूम, समाधान वानखडे, दिनेश टेकाम, धर्मपाल डोंगरे, सुभाष खंडार, विनोद जायलवाल, साक्षी उमक, सुमित खांडेकर, जगदीश अंबाळकर, अशोक पवार, आदी उपस्थित होते.

## जिल्ह्यात लोकसहभागातून शेत पांदण रस्ते व जलपुनर्भरणाची कामे

**◆ अशासकीय संस्थांकडून अर्ज आमंत्रित**

प्रतिनिधी १६ मे

**अमरावती:** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सोयीसाठी ‘पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेत पांदण रस्ते व जलपुनर्भरण योजना’ राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लोकसहभागातून शेत पांदण रस्ते आणि जलपुनर्भरणाची कामे करण्यासाठी इच्छुक अशासकीय संस्थांकडून अर्ज सादर करण्याचे आवाहन आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

या योजनेमध्ये शेतकरी लोकसहभाग, ग्रामपंचायत स्वनिधी आणि जिल्हा नियोजन समिती निधी यांच्या अभिसरणातून ही कामे केली जाणार आहेत. ही योजना कोणत्याही एजन्सीच्या नफ्यासाठी नसून, ती पूर्णपणे लोकसहभाग आणि सेवाभावावर आधारित आहे, जेणेकरून कमी खर्चात शेतकरी हिताचे रस्ते निर्माण होतील.

जिल्हास्तरावरून या योजनेसाठी प्रति १ किलोमीटर पांदण रस्त्यासाठी कमाल ९ लाख रुपयांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये लोकसहभागाची किमान मर्यादा १.५ लाख रुपये असून, उर्वरित रक्कम जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून दिली जाईल. या निधीवर सर्व शासकीय कपाती लागू राहतील. तसेच, पांदण रस्त्यांचे काम पूर्ण झाल्यानंतर (लोकसहभागातून होणारे मातीकाम वगळून) मोजमापानुसार जिल्हा नियोजन समितीचा निधी वितरित केला जाईल. जे अर्जदार जास्तीत जास्त लोकसहभाग आणि कमीत कमी शासकीय निधीमध्ये काम करण्यास तयार असतील, अशा संस्थांना प्राधान्य दिले जाईल. याशिवाय, यापूर्वी ‘जलयुक्त शिवार’ किंवा तलावातील गाळ काढण्याच्या योजनांमध्ये काम करण्याचा अनुभव असलेल्या संस्थांना विशेष प्राधान्य मिळेल.

इच्छुक अशासकीय संस्थांनी आपल्या अर्जासोबत संस्थेचे मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र, अध्यक्ष व सदस्यांची नावे, अनुभव प्रमाणपत्र आणि यापूर्वी केलेल्या कामांची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. हे अर्ज उपजिल्हाधिकारी (रोहयो) कार्यालय, अमरावती येथे सादर करायचे आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी शुक्रवार, दि. १५ मे ते २२ मे २०२६ पर्यंत (सुटीचे दिवस वगळून) सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. प्राप्त अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीमार्फत २५ मे २०२६ रोजी केली जाईल.

## आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निवासस्थानापासून महानगरपालिका अमरावतीच्या प्रत्यक्ष घरगणनेचा शुभारंभ

प्रतिनिधी १६ मे

**अमरावती:** महानगरपालिकेच्या घरगणना अभियानाचा शुभारंभ आज दिनांक १६ मे २०२६ रोजी सकाळी ०८ वाजता मा. श्रीमती वर्षा लड्डा, आयुक्त, मनपा अमरावती यांच्या निवासस्थानास घरगणना क्रमांक प्रदान करून प्रत्यक्ष घरगणना कार्यास सुरुवात करण्यात आली.

यावेळी वर्षा लड्डा, आयुक्त, मनपा अमरावती, योगेश पीठे, उपायुक्त (१), मनपा अमरावती, नंदकिशोर तिखीले, चार्ज अधिकारी झोन क्र. १, अक्षय निलंगे, सहाय्यक शहर जनगणना अधिकारी, कैलास कुलट, प्रफुल अनिलकर, श्री डेसमेंट फर्नांडिस प्रगणक तसेच श्रीमती राजकन्या डाबेराव पर्यवेक्षक उपस्थित होते. यावेळी आयुक्त




वर्षा लड्डा यांनी घरगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया असून नागरिकांनी प्रशासनाला योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच घरगणना कार्य अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

## बिअर शॉपीच्या दुकानाला आग



प्रतिनिधी १६ मे

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथील आठवडी बाजार इस्तित सरगम बियर शॉपीच्या दुकानाला शॉर्टसर्किटमुळे आग लागली. आग इतकी भयंकर होती की थोड्याच वेळामध्ये आगे मध्ये बियर च्या बाटल्या आगीत भक्ष झाल्या तात्काळ अचलपूर नगरपालिकेच्या फायर विभागाने आगीवर नियंत्रण करत आग विझवली परंतु या आगीमुळे मोठ्या प्रमाणात सरगम बिअर शॉपी चे संचालक जयस्वाल व सुरेश वाधवानी यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून घटनास्थळी आग विझवण्यासाठी संपूर्ण व्यापार संकुल चे व्यापाऱ्यांनी मदत केली.

## शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची मोहीम

**३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन**

प्रतिनिधी १६ मे

**अमरावती:** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, चांदूर रेल्वे उपविभागातील चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर आणि धामणगाव रेल्वे तालुक्यांमध्ये शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या निर्देशांनुसार ही मोहीम राबविण्यात येत असून, वर्षानुवर्षे हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत असलेल्या शेकडो गरीब व गरजू कुटुंबांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती चांदूर रेल्वेच्या उपविभागीय अधिकारी श्रद्धा उदावंत यांनी दिली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४०, ५२ व ६४ मधील तरतुदींनुसार ही प्रक्रिया राबवली जात आहे. या योजनेंतर्गत दि. १ जानेवारी २०११ किंवा त्यापूर्वी शासकीय जमिनीवर करण्यात आलेली आणि सद्यस्थितीत केवळ निवासासाठी वापरली जात असलेली अतिक्रमणेच नियमितीकरणास पात्र ठरतील. या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, ज्या नागरिकांचे निवासी अतिक्रमण ५०० चौरस फुटांपर्यंत आहे, त्यांना नियमितीकरणासाठी कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही, म्हणजेच ही प्रक्रिया पूर्णपणे विनामूल्य असेल.

दिनांक १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी संबंधित जागेवर निवासी अतिक्रमण अस्तित्वात असल्याच्या पुराव्यासाठी प्रशासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीकरिता वॉर्ड किंवा प्रभागनिहाय तयार केलेली मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती, ग्रामपंचायतीमधील आठ-अ उतारा, अधिकृत अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवहीतील नोंद, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना किंवा उपग्रह छायाचित्र (सॅटेलाईट इमेज) हे पुरावे ग्राह्य धरले जाणार आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी आपले अर्ज आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह संबंधित ग्राम विकास अधिकारी (ग्रामपंचायत) किंवा संबंधित नगर परिषद व नगरपालिका प्रशासनाकडे दिनांक ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. जे नागरिक या निश्चित मुदतीत अर्ज सादर करणार नाहीत, त्यांच्या अतिक्रमणावर भविष्यात प्रशासनाकडून कायदेशीर निष्कासनाची कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## नीट पेपर फुटी प्रकरणी युवक काँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



प्रतिनिधी १६ मे

**अमरावती :** देशात NEET परीक्षेमध्ये पेपरफूटी विरोधात जिलाधिकारी कार्यालय समोर अमरावती जिल्हा युवक कॉंग्रेस च्या वतीने आंदोलन केले व केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे पोस्टर जाळून निषेध केला.

यावेळी अनुराग भोयर उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस, राहुल येवले जिल्हाध्यक्ष अमरावती जिल्हा युवक कॉंग्रेस, अनिकेत ढेंगले कार्याध्यक्ष, प्रदेश महासचिव परीक्षित जगताप ,रितेश पांडव ,निलेश गुहे ,नितेश वानखेड़े , नितिन काले उपाध्यक्ष शहर, वैभव देशमुख विधानसभा अध्यक्ष ,आशीष यादव बड़नेरा अध्यक्ष, शुभम् बांबल, उपस्थित होते.

# अमरावती जिल्ह्याचे पाणी टंचाईवर आमदार रवि राणा बैठकीत आक्रमक

प्रतिनिधी १६ मे

**◆ निष्काळजी अधिकाऱ्यांना ईशारा**

**अमरावती :** जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील वाढत्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आज अध्यक्ष विधानसभा आश्वासन समिती व आमदार रवी राणा यांनी मालटेकडी चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात आयोजित बैठकीत राणा यांनी प्रशासनावर जोरदार टीका करत निष्काळजी अधिकाऱ्यांना कठोर इशारा दिला. अमरावती शहर, भातकुलि, अमरावती, चिखलदरा, अचलपूर, चांदूरबाजार, दर्यापूर , धरणी, चिखलदरा व अंजनगाव सुर्जी व अमरावती महानगरपालिका परिसरातील पाणीपुरवठ्याचा आढावा त्या बैठकीत घेण्यात आला.

बैठकीत आमदार राणा यांनी उपस्थित उप महापौर, नगराध्यक्ष, नगर सेवक, सरपंच व नागरिकांच्या व युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांच्या पाणी पुरवठा तक्रारी ऐकून घेऊन सांगितले की, अनेक गावांमध्ये तसेच



शहरातील प्रभागांमध्ये चार ते पाच दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. जनतेला मुबलक आणि नियमित पाणी मिळाले पाहिजे, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. माझे सोबत गल्लीत फिरावे लागणारं असा दम दिला.

मुख्य अभियंते, अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद चे अधिकारी तसेच संबंधित विभागातील अभियंत्यांना ग्रामीण भागात प्रत्यक्ष फिरून परिस्थितीची पाहणी करण्याचे निर्देश देण्यात आले. येत्या पाच दिवसांत शहर व ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेशही त्यांना देण्यात आले.

गावागावांमध्ये व शहरांमध्ये पाण्याच्या टाक्या पूर्ण क्षमतेने भरल्या जात नसल्यामुळे नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नसल्याची बाब बैठकीत समोर आली. काही ठिकाणी २५ लाख लिटर क्षमतेच्या टाक्यांमध्ये केवळ ३० ते ४० टक्के पाणी साठवले जात असल्याबद्दल आमदार राणा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

जल जीवन मिशनअंतर्गत मोठ्या प्रमाणात योजना राबविण्यात आल्या असल्या तरी ग्रामीण भागातील नागरिकांच्या घरापर्यंत पाणी पोहोचत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. ही परिस्थिती अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे निर्माण झाल्याचा आरोप करत कामात हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी आयोजित बैठकीत दिला.

तसेच अधिकाऱ्यांनी नागरिकांचे फोन तत्काळ उचलावेत, त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात आणि प्रत्यक्ष क्षेत्रात उतरून काम करावे, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

यावेळी जिल्हा प्रशासन चे बैठकीला मुख्य अभियंता प्रभारीश्री .गव्हाणकर, प्रभारी अधीक्षक अभियंता विवेक सोळंके, कार्यकारी अभियंता श्री. चव्हाण, उपअभियंता मनोज वाकेकर, गुरुदत्ता अविनाशे, अतुल काटे, सलामे, झेड. एस. खान, संजय देवकर, दिनेश मुंडे, चंद्रकांत ठाकरे, निखील गुरव, अमोल बोरकर, अफजल मुस्तफा खान, विजय शेंडे, अभय देशमुख, सोनबा मेंढे, अंकिता तायडे, रविंद्र पवार (मनपा), स्नेहा धावडे, कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, राज्य कालवे भूजल सर्वेक्षण विभागाचे उपसंचालक, कार्यकारी अभियंता घाटोळे, लांडे, उपअभियंता उपअभियंता उमाळे, प्रदीप शेवडे, उपविभागीय अधिकारी अभियंता आदी अधिकारी उपस्थित होते.यासोबतच युवा स्वाभिमान पार्टीचे नगरसेवक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष व पदाधिकारी मध्ये सुनील भाऊ राणा, उपमहापौर सचिन भेंडे, गटनेते .नाना आमले, शिक्षण सभापती अॅड. सौ.प्रिती हर्षल रेवणे, डॉक्टर राजेंद्र तायडे गटनेता शिवसेना, नगरसेवक श्री.किशोर जाधव, श्रीमती सुमती ढोके, नगरसेवक श्री.अजय मदनमोहन जयस्वाल, नगरसेवक श्री.दिपक किसनलाल साहु, नगरसेवक श्रीमती नंदा धनंजय सावदे, नगरसेवक सौ.रजनी राजेश डोंगरे, नगरसेवक सौ.गौरी शैलेंद्र मेघवानी, नगरसेवक श्री.महेश धनराज मुलचंदानी, नगरसेवक श्री.योगेश रघुनाथ विजयकर, नगरसेवक सौ.अर्चना अशोक पांडे, नगरसेवक सौ.प्रियंका भुषण पाटणे, नगरसेवक श्रीमती मिराताई कांबळे, नगरसेवक सौ.मधुरा मिलींद कहाळे, आमदार रवी राणा यांचे खाजगी सचिव उमेश ढोणे, जिल्हा अध्यक्ष सोनाली नवले, हर्षल रेवणे, अवी काळे, शंकर डोंगरे, पराग चिमोटे, उदय पर्वतकर, अशोक पांडे, शैलेंद्र मेघवानी, छोटू आकोटकर, क्षीलेश पदवाड, वंदना जामनेर, पंकज गायकवाड, प्राध्यापक अजय गाडे, पद्माकर गुल्हाने, भूषण पाटणे, आशिष गावंडे, मंगेश पाटील इंगोले, तुषार दुधे, उमेश बसरे, संतोष मोटघरे, विजय मेश्राम, सिद्धू गोंडाने, धीरज केने, किरण अंबाडकर, अर्जुन दाते, नीरज गवई, भूषण खांडेकर, श्रीकृष्ण बैलमारे, राजेश तारडेजा, कुणाल केवतकर, निलेश पवार, सुरज सुरज बटवले, पंकज सुरळकर, तमीज शाहा, मधुकर देऊळकर, गौतम हिरे, लाला तिवारी, मुकेश ऊसरे, उद्धवराव कराळे, दिनेश टेकाम, जगदीश अंबाळकर, सुभाष खंडार, सुधाकर काळे, अश्विन ऊके, देवानंद राठोड, बंडू डकरे, गौतम खंडारे, सुरेश पाडोळे, अतुल झजाळ, मंगेश बेडेकर, भूषण वाने, नगरसेवक शंकर डोंगरे, सुनील भोपसे , शुभम उंबरकर, आदि युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित राहून त्यांनी आप आपल्या पाणी पुरवठा समस्या बैठकीत मांडल्या.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि १६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## खरीप हंगामासाठी बियाणे, खते व किटकनाशक तक्रार निवारणासाठी नियंत्रण कक्ष सुरू

**वाशीम :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते व किटकनाशके वेळेत, गुणवत्तापूर्ण व मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हावीत यासाठी कृषी आयुक्तालयाने नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे. शेतकरी, वितरक व विक्रेत्यांच्या अडचणींचे तातडीने निवारण करण्यासाठी ॅज्ज क्रमांक, टोल फ्री क्रमांक व ई-मेल सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.कृषी आयुक्त यांच्या सूचनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या या नियंत्रण कक्षासाठी ९८२२४४६६५५ हा WhatsApp क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच कृषी विभागाच्या १८००२३३४००० या टोल फ्री क्रमांकावरही संपर्क साधता येणार आहे. controlroom.qc.maharashtra@gmail.com या ई-मेलवरदेखील तक्रारी नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे.निविष्ठांची गुणवत्ता, किंमत, साठेबाजी व लिंकींग संदर्भातील तक्रारी नोंदविताना नाव, पत्ता, संपर्क क्रमांक व तक्रारीचा संक्षिप्त तपशील देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तक्रार कोऱ्या कागदावर लिहून त्याचा फोटो WhatsApp अथवा ई-मेलवर पाठविल्यास तक्रारींचे निराकरण अधिक सोयीस्कर होणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.



# भ्रष्टाचारात 'हात' मळले, जळाले की जळले, कारण नाही कळले !



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील राजकारणाचे केंद्रबिंदू असलेल्या रिसोड पंचायत समितीच्या अभिलेख कक्षाला दि. १५ मे रोजी रात्री साडे आठच्या दरम्यान अचानक आग लागली. सदर घटनेत महत्त्वाच्या फाईल जळून खाक झाल्याची माहिती समोर येत आहे. मात्र आगीचे कारण अद्याप गुलदस्त्यात असल्याने अभिलेख कक्ष जळाले की जाळले अशी खमंग चर्चा जिल्हाभर होत आहे. येथील पंचायत समितीच्या घरकुल योजनेतील घोटाळयाची वृत्तमालिका सिटीन्युज सुपरफास्टने नुकतीच प्रकाशित केली होती. त्या अनुषंगाने सदर आगीची घटना संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. भ्रष्टाचाराचे पुरावे नष्ट करण्यासाठी तर ही आग लागली असेल का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## रिसोड पंचायत समितीच्या अभिलेख कक्षाला आग अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार नष्ट करण्याचा भाग

प्राप्त माहितीनुसार काल दि.१५ मे गुरुवारी रात्री साडे आठच्या सुमारास अचानक ही घटना घडली. सदर आगीत महत्वाची कागदपत्रे जळून खाक झाल्याची माहिती समोर येत आहे. तद्वतच अग्निशामक दलाच्या प्रयत्नाने आग नियंत्रणात आली अन्यथा मोठा अनर्थ घडला असता अशी सर्वत्र चर्चा होत आहे. मात्र रिसोड पंचायत समितीसाठी ही आगीची घटना काही नवखी नाही. याआधी सुद्धा आस्थापना विभागाला



आग लागली होती. त्यावेळी शौचालय अनुदान घोटाळा मोठ्या प्रमाणात झाला होता हे सुद्धा सर्वश्रुत आहेच ! आणि सद्यस्थितीत दैनिक सिटीन्यूज सुपरफास्टने घरकुल योजनेतील घोटाळ्याची वृत्तमालिका प्रकाशित करून संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवून दिली होती. आणि लगेचच अभिलेख कक्षाला आग लागण्याची घटना घडते हा योगायोग म्हणावा की संयोग हे गूढ मात्र कायम असले तरी सिटीन्यूज सुपरफास्टचे भाकीत अखेर सत्यात उतरले अशी चर्चा सर्वसामान्य जनता करत आहे. परिणामी या गंभीर घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.

### नेमक्या कोणत्या फाईल जळाल्या..?

काही वर्षापूर्वी रिसोड पंचायत समितीच्या आस्थापना विभागाला आग लागून शौचालय अनुदानातील भ्रष्टाचार खाक करण्यात आला होता. आणि वर्तमानस्थितीत सिटीन्यूज सुपरफास्टने घरकुल योजनेतील भ्रष्टाचाराचे बिंग फोडले आहे. त्या पार्श्वभूमीवर सदर आगीत कोणत्या फाईल जळाल्या ? या प्रश्नाचे उत्तर शोधणे हे तपास यंत्रणेसाठी खुप महत्त्वाचे ठरणार आहे. शिवाय १५ व्या वित्त आयोगातील केवळ कागदोपत्री केलेल्या कामांच्या फाईल तर जळाल्या नाहीत ना ! हे पाहणे सुद्धा क्रमप्राप्त आहे. तसेच तालुक्यातील शाळांच्या दुरुस्ती कामातील बिल व मोजमाप पुस्तिका आणि समाज कल्याण योजनेतील वैयक्तिक लाभाच्या योजनेतील अर्ज व मंजुरीच्या फाईल शाबुत आहेत की त्यापण जळून खाक झाल्या आहेत हे पाहणे सुद्धा खुप महत्त्वाचे ठरणार आहे. घटना कोणत्या कारणाने घडली हे आज ना उद्या स्पष्ट होणार आहेच. परंतु सिटीन्यूज सुपरफास्टने येथील पंचायत समितीच्या भ्रष्टाचाराची पोलखोल केल्या नंतर लगेचच आगीची घटना घडली ही बाब सर्वांनाच अचंबीत करत आहे. परिणामी आग लागली की जाणीवपूर्वक लावण्यात आली असा प्रश्न सर्व सामान्य नागरिक विचारत आहेत.

## थोडक्यात

### जिल्ह्यात २ हजार ५९४ प्रकरणांचा निपटारा



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना व सेवा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हाभर आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून आयोजित या शिबिरांमध्ये विविध विभागांच्या माध्यमातून नागरिकांच्या तक्रारी, अर्ज आणि मागण्यांवर तत्काळ कार्यवाही करण्यात येत असून अनेक प्रकरणांचा जागेवरच निपटारा करण्यात आला.जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये आयोजित शिबिरांदरम्यान महसूल, ग्रामविकास, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य, महिला व बाल विकास तसेच इतर विभागांच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांना आवश्यक दाखले, प्रमाणपत्रे, योजनांची माहिती तसेच विविध शासकीय सेवांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला.प्राप्त अहवालानुसार वाशिम तालुक्यात ७३९, मालेगावमध्ये २८६, रिसोडमध्ये ३२५, मानोरामध्ये १४४, मंगरुळपीरमध्ये ६३५ तर कारंजा तालुक्यात ४६५ अशा एकूण २ हजार ५९४ प्रकरणांवर कार्यवाही करण्यात आली. शिबिरांमध्ये नागरिकांच्या समस्या समजून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी तत्परतेने कार्यवाही केली. अनेक प्रकरणांचा तात्काळ निपटारा झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

### माणिक मोरे यांचे निधन

**रिसोड:** तालुक्यातील घोटा येथील रहिवाशी माणिक किसन मोरे यांना दि.१४/५/२०२६ रोज गुरूवार ला देवाज्ञा झाली. मृत्यू समयी त्यांचे वय ५९ वर्षाचे होते.तरी अस्थी विसर्जनाचा कार्यक्रम दि.१७/५/२०२६रोज रविवार ला ठेवला आहे.माणिक किसन मोरे मनमिळावू स्वभावाचे होते.त्याच्या जाण्याने मोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.त्याच्या पशचातएक मुलगा, एक मुलगी,चार भाऊ नातवंडे असा मोठा अप्त परिवार आहे.



शहरातील मुख्य रस्त्याच्या...

## नाली बांधकामात भ्रष्टाचार, नगरसेवकाची तक्रार !

### निकृष्ठ दर्जाचा काम होत असल्याचा पुरण बदलाणी यांचा आरोप

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहरातील पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक दरम्यान सुरू असलेल्या नाली बांधकामावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रभाग क्र.०६ चे नगरसेवक पुरण बदलाणी यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार देत नालीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप केला आहे. कामाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, अनेक तांत्रिक त्रुटी आढळून आल्याचा दावा त्यांनी केला आहे.त्यामुळे सुरू असलेले नालीचे काम बंद करण्यात आले असून नियमानुसार न केल्यास कामे करू देणार नसल्याचा इशारा नगरसेवक बदलाणी यांनी दिला आहे.



प्रभाग ०६चे नगरसेवक पुरण बदलाणी यांनी दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की, वाशीम शहरातील पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मुख्य मार्गाच्या रस्ते कामाआधी नाली बांधकामाला सुरवात झाली आहे.मात्र या नालीचे बेड नियमानुसार चार इंचांचे असणे अपेक्षित असतांना प्रत्यक्षात ते केवळ दोन इंचांचे करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे . तसेच नालीमधील कुपिंगचे कामही निर्धारित मापापेक्षा कमी दर्जाचे होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय गज बांधणी देखील नियमानुसार करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.या प्रकरणाची संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ तांत्रिक पाहणी करून ठेकेदार व अभियंत्यांना आवश्यक सूचना द्याव्यात तसेच पुढील कामे इस्टिमेट व वर्क ऑर्डरनुसारच करण्यात यावीत. अशी मागणी तक्रारीतून करण्यात आली आहे. भविष्यात प्रभाग क्र. ०६ मधील सर्व विकासकामे उत्कृष्ट दर्जाची व नियमानुसार व्हावीत, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे अशी मागणी उबाठा पक्षाचे नगरसेवक पुरण बदलाणी यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांच्यासह जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या तक्रारीतून केली आहे.परंतु आता तरी या नालीचे बांधकाम दर्जेदार केले जाणार का ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आमचीच माती, आता नैसर्गीक शेती !

### नैसर्गिक शेतीकडे ८९२२ शेतकरी ७२४३ हेक्टर क्षेत्रावर जिल्ह्याची वाटचाल

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्याची नैसर्गिक शेतीच्या दिशेने भक्कम पाऊल टाकत असून शेतकरी आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करीत आहेत. आत्मा व कृषी विभागामार्फत परंपरागत कृषि विकास योजना, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन तसेच राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत जिल्ह्यात नैसर्गिक व सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन देण्यात येत आहे. या अभियानास जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून पर्यावरणपूरक व खर्चमुक्त शेतीचा नवा आदर्श निर्माण होत आहे.

सदर योजनांअंतर्गत जिल्ह्यातील तब्बल ८९२२ शेतकरी ७२४३ हेक्टर क्षेत्रावर नैसर्गिक व सेंद्रिय शेती करीत आहेत. रासायनिक खत व कीटकनाशकांच्या वाढत्या खर्चाला पर्याय म्हणून शेतकरी आता नैसर्गिक शेतीचा स्वीकार करीत असून उत्पादन खर्चात मोठी बचत होत आहे. जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या २१ जैविक निविष्ठा संसाधन केंद्रांच्या माध्यमातून जीवामृत, दशपर्णी अर्क, सेंद्रिय खते तसेच इतर जैविक निविष्ठा निर्मितीबाबत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, जमिनीची सुपीकता वाढण्यासही मदत होत आहे.

जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी नैसर्गिक व सेंद्रिय शेतीचा अवलंब करावा, असे आवाहन प्रकल्प संचालक अनिसा महाबळे यांनी केले आहे.

## डॉ.जोगदंड महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

श्रीक्षेत्र डव्हा येथील डॉ. श्रीमती रुक्मिणीदेवी जोगदंड कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय डव्हा या महाविद्यालयाचा अमरावती बोर्ड परीक्षा २०२६ च्या निकालाचे औचित्य साधून महाविद्यालयामध्ये संस्थेच्या वतीने उत्कृष्ट मार्क घेतलेल्या विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले .या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे सचिव मा. प्राचार्य प्रकाशजी कापुरे तर प्रमुख उपस्थितीमध्ये मुख्याध्यापक राजेंद्र चौधरी , गणेश उगले, संतोष भाऊ आढाव जेष्ठ पत्रकार , बंडूभाऊ इरतकर शिवाजी पारेकर , अनिल भाऊ इंगळे पत्रकार तसेच माजी विद्यार्थिनी डॉक्टर कु. कांचन महाजन इत्यादी उपस्थित होते. वर्ग १२ वा विज्ञान शाखेमधून प्रथम क्रमांक कु.ऋतुजा सुरेश आप्पा महाजन या विद्यार्थिनींने- ९० मार्क मिळवित संस्थेचे नाव उज्वल केले , द्वितीय क्रमांक कु. प्रतीक्षा शिवाजी पारेकर व कु. पायल



बंडू खरात या दोघींनी ७८.३३ मिळून द्वितीय क्रमांक मिळवला तर कु. हर्षा दशरथ वाटाणे हिने ७८ इमिळवून तृतीय क्रमांक पटकावला. तसेच वर्ग १२ वा कला शाखेमधून कु.कोमल गणेश उगले ७४.१७ टक्के घेऊन प्रथम क्रमांक मिळविला, सम्यक गणेश सहस्त्रबुद्धे या विद्यार्थ्याने ६६ घेऊन व्दितीय क्रमांक पटकाविला तसेच कु. विधी संतोष आढाव हिने ६४.१७इमिळवून तृतीय क्रमांक पटकावला. सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाला प्रा. सौ अंजली काटेकर , प्रा. विष्णू घोळवे , गणेश खरात, गणेश जायभाये, कु. मयुरी वर्मा , मंगेश माने, सुरेश मुंडे , राजू राऊत , अरुण गोरे इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. श्रीधर पेटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश खरात यांनी केले .

## कंत्राटदाराचे शोषण, अधिकाऱ्याचे पोषण !

***कामे वाटप करताना लॉटरी पद्धतीचा नियम गुंडाळला *संघटनेचा आरोप; महावितरण कार्यालयातील प्रकार**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यातील शेतकरी, गावकऱ्यांच्या वीज सुविधेसाठी जिल्हा नियोजन समिती मार्फत महावितरणला सन २०२३-२४आणि सन २०२५-२०२६ या वर्षासाठी सुमारे ३० ते ३५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला, मात्र कंत्राटदारांना कामे वाटप करताना ज्या एजन्सी २० इबिलो आहेत, एच ओ नियमानुसार समप्रमाणात कामे वाटप करण्याची गरज असताना महावितरण कडून नियमाचे उल्लंघन करून लॉटरी पद्धतीचा नियम गुंडाळून काही ठराविक एजन्सीज ना कामे वाटप केल्याचा आरोप इलेक्ट्रिकल कंत्राटदार असोसिएशनने केला आहे. अधिकाऱ्याच्या वाढीव टक्केवारीच्या धोरणामुळे कामे निकृष्ट होत असून खऱ्या कंत्राटदाराचे मरण होत आहे. तर अधिकाऱ्याचे पोषण होत आहे.

वाशिम सर्कल अंतर्गत २०२३ ते २०२५ पर्यंत सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना कोणतेही लॉटरी पद्धत किंवा नियमानुसार नियम न पाळता लाखो रुपयाची कार्यारंभ आदेश काही ठराविक मी मोजक्यात एजन्सीला दिलाचा आरोप होत आहे. जिल्हा नियोजन समितीकडून महावितरण ला दिलेल्या लाखो कामाच्या काम वाटपात मोठ्या प्रमाणात झाले असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी असलेल्या अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी सुशिक्षीत बेरोजगार संघटनेच्या वतीने करण्यात आली. बेरोजगारांना रोजगार देण्याऐवजी अधिकारी टक्केवारीसाठी बेरोजगारी वाढवत आहेत.

### निधी सर्मपित करण्याचे पत्र, सुरू आहे भ्रष्टाचाराचे सत्र

जिल्हा नियोजनाच्यावतीने महावितरणला २०२३-२४ या वर्षात शिल्लक राहीलेला निधी सर्मपित करण्यासाठी अधिक्षक अभियंत्यांनी ५ मे २०२४ रोजी जिल्हा अधिकारी व जिल्हा सचिव नियोजन समिती यांना पत्र दिले होते.तेव्हा पासून भ्रष्टाचाराचे सत्र सुरू असून अधिकारी ज्या कामातून दाम मिळते तेच काम करतात. नाहीतर टाळाटाळ करतात. हे सिध्द होत आहे. या प्रकरणाची सिटी न्युज सुपरफास्टने २५ जून २०२४ रोजी भ्रष्टाचाराचा विधी टक्केवारीसाठी परत जातो निधी असे वृत्त प्रकाशित केले होते. आता मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित असूनही खर्च होत नसल्याचे सिध्द झाले आहे.

### निधी अखर्चित...

जिल्हा नियोजन समितीकडून जवळपास ३० ते ३५ कोटी रुपयांचा निधी महावितरण ला मंजूर करण्यात आला आहे मात्र या अनुषंगाने काही ठराविक एजन्सी कामे दिली असून मोठ्या प्रमाणावर निधी अखर्चित असल्याचेही समोर येत आहे.




# घरपोच गॅस सेवा, डिलिव्हरी बॉय लाटतात मेवा !

●सिटी न्युज ब्युरो @ शेलुबाजार●

केंद्र शासनाच्या नियमानुसार गॅस सिलिंडरची घरपोच सेवा मोफत आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या नियमानुसार गॅस एजन्सीच्या पाच किलोमीटर परिसरात तर गॅस सिलिंडर घरपोच देणे बंधनकारक आहे. त्यासाठी एक रुपयाही अतिरिक्त आकारता येत नाही. मात्र हे सर्व नियम धाब्यावर बसवून शेलूबाजार येथील गुप्ता गॅस एजन्सी घरपोच गॅस सेवा तर देत नाहीच पण त्यानावाखाली अतिरिक्त शुल्क आकारून प्रत्येक सिलेंडरवर अतिरिक्त २० ते २५ रुपये उकळून ग्राहकांची आर्थिक लूट करत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या गंभीर प्रकाराची संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी अपेक्षा गॅस धारकांकडून व्यक्त केली जात आहे.

## गुप्ता गॅस एजन्सीकडून ग्राहकांची आर्थिक लूट









### सरकारी यंत्रणेचे नेहमीच होते दुर्लक्ष

काही दिवसांपूर्वीच शहरात पोलिसांनी घरगुती गॅसचे अवैध रिफिलिंग करताना आढळून आल्याने त्यांच्यावर कारवाई केली आहे. शहरातील बहुतांश गॅस एजन्सी ग्राहकांना गॅसचे वजन करून न देताच वितरण करत असल्याने ग्राहकांचा गुप्ता गॅस या एजन्सीधारकांवर संशय बळावत आहे. याबाबत संबंधित यंत्रणेकडे व गॅस एजन्सीकडे तक्रार करूनदेखील याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

**निखिल दिलीप गुठे ( त्रस्त, गॅस ग्राहक )**

### अतिरिक्त शुल्क देण्यासाठी ग्राहकांना दमदाटी..

ग्राहकांना गॅस कंपनीकडून किमतीची जी छापील पावती मिळते, त्यामध्येच घरपोच गॅस देण्याचेही पैसे अंतर्भूत असतात. मात्र डिलिव्हरी बॉयकडून घरपोच गॅस देण्याचे २० ते ५० रुपये अतिरिक्त लागतात, असे सांगत ग्राहकांची अडवणूक केली जाते. या अतिरिक्त सर्व्हिस चार्ज घेण्याला संबंधित एजन्सीचीदेखील मूकसंमती असल्याचे दिसून येते. या पैशांसाठी ग्राहकांना गॅस पोहोच करणाऱ्यांकडून दमदाटी झाल्याच्या घटनादेखील घडल्या आहेत. पैसे न दिल्यास घरात गॅस आणून न देणे, उशिरा डिलिव्हरी करणे किंवा स्टॉक नाही, अशी कारणे दिली जातात.

### गॅसचे वजन करून देत नाहीत

गॅस मोजून मागितला तर काटा नसल्याचे कारण देत नेहमी पुढील वेळी मोजून देईन, असे आश्वासन डिलिव्हरी बॉय देतात. सिलिंडरमधील गॅस काही प्रमाणात काढून घेतलेला असावा, अशी शंका येते.

प्राप्त माहितीनुसार शेलूबाजार येथील अर्जुन सुर्वे यांनी गुप्ता गॅस एजन्सी विरोधात जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करून आत्मदहन आंदोलन करण्याचा गंभीर इशारा दिला होता. त्यांच्या तक्रारीची दखल घेत या गंभीर प्रकाराची तातडीने सुनावणी घेण्यात आली होती. त्यानुसार गुप्ता गॅस एजन्सीकडून सुर्वे यांच्या मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन दिल्यामुळे तूर्तास या आत्मदहन आंदोलनाला स्थगती देण्यात आली. मात्र एजन्सीने दिलेले लेखी आश्वासन हवेतच विरले असून एजन्सीच्या डिलिव्हरी बॉयकडून सर्व्हिस चार्जच्या नावाखाली गॅस ग्राहकांची आर्थिक लूट सुरूच असल्याचे बोलले जात आहे. या गंभीर बाबीकडे सबंधित प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी शेलूबाजार परिसरातील गॅस धारक करत आहेत.

मागील तीन-चार महिन्यांपासून गॅस घेऊन येणारा माझ्याकडून तीस रुपये अतिरिक्त घेत आहे. विचारणा केल्यास ३० रुपये सर्व्हिस चार्ज लागत असल्याचे तो नेहमीच सांगतो.

**निखिल दिलीप गुठे ( त्रस्त, गॅस ग्राहक )**

घरगुती वापराच्या गॅसचा काळाबाजार आणि ग्राहकांची लूट रोखण्यासाठी शासनाने सिलिंडरची बुकिंग ऑनलाइन केली. शिवाय वितरकांचा मोबदलाही सिलिंडरच्या किमतीत अंतर्भूत केलेला आहे. मात्र, तरीही गुप्ता गॅस एजन्सी घरपोच सिलिंडर देताना दिसत नाही एजन्सीच्या डिलिव्हरी चे २० ते ५० रुपये उकळले जात आहेत. जे ग्राहक अधिकचे पैसे देत नाहीत, त्यांना वेळेत आणि घरपोच सिलिंडर दिले जात नाही.गॅस सिलिंडरच्या वाढलेल्या दरामुळे आधीच गॅस ग्राहकांचे कंबरडे मोडले आहे. त्यातच गॅस प्रत्येक सिलिंडरमागे २० ते ५० रुपये अधिकचे वसूल केले जातात. प्रत्यक्षात गॅसच्या मूळ किमतीमध्येच वितरकाचे कमिशन आणि घरपोच देण्याची रक्कम अंतर्भूत असते. असे असतानाही गॅस ग्राहकांना लुबाडण्याचे काम गुप्ता गॅस एजन्सी येथे सुरू आहे. याशिवाय ग्राहकांना गॅस सिलिंडरचे वजन करून देण्याचाही वितरकांना विसर पडलेला आहे. ग्राहकांनी मागणी केल्यानंतरही वजन करणे टाळले जाते.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. १६ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## रागाच्या भरात पत्नीची कुऱ्हाडीने हत्या; गुन्हा दाखल

**जळगाव जामोद:** तालुक्यातील भेंडवळ बु. येथे कौटुंबिक वादातून पतीने पत्नीच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याची घटना मायावती भारसाकळे गुरुवारी पहाटे उघडकीस आली. या मृतक प्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मायावती शहादेव भारसाकळे (वया ४६, रा. भेंडवळ बु.) या घरी असताना त्यांचे पती शहादेव शंकर भारसाकळे यांनी रागाच्या भरात त्यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार केला. या हल्ल्यात मायावती या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने उपचारासाठी सामान्य रुग्णालय, खामगाव येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. आरोपी शहादेव भारसाकळे हा नेहमी दारूच्या नशेत घरी येऊन पत्नीशी वाद घालत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून रागाच्या भरात त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात.

# भरधाव कारच्या धडकेत दोन सुरक्षा रक्षकांचा मृत्यू

### खामगाव शहरातील हॉटेलसमोरील घटना

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** नांदुरा रस्त्यावर भरधाव कारने हॉटेलच्या गेटजवळ बसलेल्या - दोन सुरक्षा रक्षकांना जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मध्यरात्री सुमारे २.३० वाजता घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गोविंद किसन शेगोकार (वय ६४) आणि विवेक देविदास पायघन (वय ४१) हे दोघेही सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होते. शुक्रवारी पहाटे ड्युटीदरम्यान ते हॉटेलसमोरील रस्त्याच्या कडेला बसले असताना पांढऱ्या रंगाची कार अचानक त्यांच्या दिशेने आली. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कारने दोघांना जोरदार धडक दिली. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, धडक इतकी भीषण होती की दोघेही काही अंतरावर फेकले गेले.मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. तेथे रक्ताचे डाग, तुटलेले



साहित्य आणि दोन्ही मृतदेह पाहून उपस्थित हादरून गेले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले; मात्र तोपर्यंत दोघांचाही मृत्यू झाला होता. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. नागरिकांनी भरधाव वाहनांच्या वाढत्या प्रकारांबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत रात्रीच्या वेळी वाहतूक नियंत्रण अधिक कडक करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी प्रितपालसिंह अमरजितसिंह संधू (वय ४३, रा. स्वामीकृपा अपार्टमेंट, अनिकट रोड, सुटाळा) यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अपघातानंतर वाहनाने धडक देऊन चालक घटनास्थळावरून पळून गेला होता. त्यानंतर शहर पोलिसांनी तपास सुरू करून आरोपीचा शोध घेत त्याला ताब्यात घेतले.

सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे तपास या हिट अँन्ड रन प्रकरणात सुरुवातीला महिला कार चालवत असल्याची चर्चा परिसरात होती. त्यामुळे शहर पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसी कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. विविध ठिकाणांवरील फुटेजची पाहणी करून आरोपी निष्पन्न करण्यात आला.

सीसी कॅमेऱ्यांची तपासणी नातेवाइकांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली.

या प्रकरणी राजेंद्र किसन शेगोकार (रा. तक्षशिलानगर, घाटपुरी) यांच्या फिर्यादीवरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०६ (१), १२५ (अ)(ब), २८१ तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४/१७७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि अमोल पाटे करीत आहे.

# खामगावात लोखंडी पहारीने वार करून पत्नीची हत्या

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** शहरातील रेल्वे गेट परिसरातील झोपडपट्टी भागात कौटुंबिक वादातून पतीने पत्नीवर लोखंडी पहारीने वार करून तिची निघृण हत्या केल्याची थरारक घटना गुरुवारी रात्री उशिरा घडली. हत्येनंतर आरोपी पती स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाला आणि 'मीच पत्नीला मारले' अशी कबुली देत शरणागती पत्करल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला असून, आरोपीला ताब्यात घेतले आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत सविता प्रकाश सोळंके (वय २२) यांचा पती प्रकाश रुपलाल सोळंके (वय २५, रा. रेल्वे गेट परिसर, खामगाव) यांच्यासोबत वारंवार कौटुंबिक वाद होत होते. गुरुवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास दोघांमध्ये पुन्हा जोरदार भांडण झाले. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपी प्रकाश सोळंके याने लोखंडी पहारीने पत्नीच्या डोक्यावर जबर मारहाण केल्याचा आरोप आहे. घटनेची माहिती पूजा रमेश सोळंके यांनी फिर्यादी संजय शेनाजी मेढे (वय ४३) यांना दिली. त्यानंतर फिर्यादी घटनास्थळी पोहोचले असता सविता सोळंके थारोळ्यात पडलेली दिसली. याप्रकरणी पोलिस पुढील तपास रक्ताच्या करीत आहे.फिर्यादीने घटनास्थळी धाव घेतली असता आरोपी प्रकाश हातात लोखंडी पहार घेऊन उभा होता. मी सविताला मारले असून, आता पोलिस ठाण्यात जात आहे, असे सांगून तो तेथून निघून गेल्याचे फिर्यादीने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक विकास पाटील करीत आहेत.

# नागेशवाडी येथे डायरियाचा फैलाव; शंभरहून अधिक ग्रामस्थ आजारी!

### अनेक घरांमध्ये उपचार सुरूः नागरिकांमध्ये भीती !

प्रतिनिधी १६ मे

**मेहकर:** तालुक्यातील घाटबोरी गट येणाऱ्या ग्रामपंचायतीअंतर्गत आदिवासीबहुल नागेशवाडी गावात डायरियाचा प्रादुर्भाव वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. उलट्या, जुलाब आणि तापाच्या तक्रारींमुळे शंभरहून अधिक नागरिक बाधित झाल्याचे शुक्रवारी समोर आले असून, अनेक घरांमध्ये सलाईन लावून उपचार सुरू असल्याचे चित्र आहे. वाढत्या रुग्णसंख्येनंतरही गावात तात्पुरते आरोग्य शिबिर उभारण्यात आले नसल्याने आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

गेल्या काही दिवसांपासून गावात मोठ्या प्रमाणावर नागरिक आजारी पडू लागल्यानंतर ग्रामपंचायत सदस्य शितल नवले यांनी आरोग्य विभागाला याची माहिती दिली. त्यानंतर समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. गवई यांच्यासह आरोग्य पथकाने गावाला भेट देत रुग्णांची तपासणी केली. काही रुग्णांना औषधोपचार देण्यात आले असून, पाण्याचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. दरम्यान, गावात दूषित पाण्याचा पुरवठा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. टेंभुखेड धरण परिसरातील विहिरीतून कोणतीही शुद्धीकरण प्रक्रिया न करता थेट पाणीपुरवठा केला जात असल्याने डायरियाचा फैलाव झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.ग्रामस्थांच्या मते, गावात नियुक्त आशा सेविका व आरोग्य कर्मचारी नियमित पाहणी करत असते, तर परिस्थिती इतकी गंभीर झाली नसती. घरोघरी रुग्ण आहेत, अनेक कुटुंबांमध्ये एकाच वेळी दोन-दोन जणांवर उपचार सुरू आहेत, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते मारुती डाखोरे यांनी दिली. दरम्यान, रुग्णांना औषधे देण्यात आली असून, पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेतले आहेत, असे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. गवई यांनी सांगितले.

# खामगाव शहरातील न. प. शाळेनजीकच्या रोहित्राला आग

### प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली!

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** शहरातील बोबडे कॉलनी परिसरात शाळा क्रमांक ५ जवळ असलेल्या महावितरण रोहित्राला शुक्रवारी दुपारच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले.

रोहित्रामधून अचानक धूर आणि आगीच्या ज्वाळा बाहेर पडू लागल्याचे पाहताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरात मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर महावितरण, पोलिस प्रशासन व अग्निशमन विभागाला माहिती



दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिकारी त्वरित घटनास्थळी दाखल झाले व परिसरातील नागरिकांना सुरक्षित अंतर राखण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अल्पावधीतच आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आल्याने संभाव्य मोठी दुर्घटना टळली.

आगीमुळे परिसरातील वीजपुरवठा काही काळासाठी खंडित करण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांना काही वेळ गैरसोयीचा सामना करावा लागला. रोहित्रामधील तांत्रिक बिघाड, ओव्हरलोड किंवा शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे; मात्र आग लागण्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित विभागाकडून तपास सुरू करण्यात आला आहे. शाळेजवळच ही घटना घडल्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

# विहिरीत पडून युवकाचा मृत्यू

प्रतिनिधी १६ मे

**जळगाव जामोद:** तालुक्यातील भेंडवळ बु, शिवारात विहिरीत पडून २४ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संकेत नीलेश ठाकरे (वय. २४, रा. चावरा ता. जळगाव जामोद) हा वडिलांसोबत भेंडवळ बु, शिवारातील गट क्रमांक ४७ मधील शेतात कामासाठी गेला होता. सकाळच्या सुमारास विहिरीतून दोर आणि बकेटच्या सहाय्याने पाणी काढत असताना त्याचा अचानक तोल गेला आणि तो थेट विहिरीत पाण्यात पडला. विहिरीतील बुडाल्याने त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. याप्रकरणी कैलास पांडुरंग ठाकरे (वय. ५०, रा. चावरा) यांनी दिलेल्या माहितीवरून जळगाव जामोद पोलिस स्टेशनमध्ये कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. घटनेची नोंद सहाय्यक फौजदार विनोद गायकवाड यांनी केली असून, पुढील तपास पोलिस कर्मचारी भागवत उबरहंडे करीत आहेत.

# रोहित्राजवळील धोकादायक फांद्या हटविण्याची मागणी

### नवसंकल्प फाउंडेशनचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** शहरातील विविध भागांमध्ये असलेल्या रोहित्र परिसरात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या झाडांच्या फांद्या, गवत तसेच साचलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तत्काळ उपाययोजना करावी, अशी मागणी करीत, नवसंकल्प फाउंडेशनच्या वतीने दि. १५ मे रोजी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले.

निवेदनानुसार, शहरातील बोबडे कॉलनी परिसरातील शाळा क्रमांक ५ जवळील वीज रोहित्राच्या परिसरात वाढलेल्या झाडांच्या फांद्या विजेच्या तारेत अडकून ठिणग्या उडत असल्याच्या घटना घडत असल्याने नागरिकांमध्ये

भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी याच परिसरातील डीपीला आग लागल्याची घटना घडल्याने नागरिकांची चिंता अधिक वाढली आहे.पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर झाडांच्या फांद्या आणि तारा एकमेकांच्या संपर्कात आल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच शहरातील सर्व वीज डीपी परिसराची तत्काळ पाहणी करून वाढलेल्या झाडांच्या फांद्या छाटणे, गवत व कचरा हटवून परिसर स्वच्छ करणे आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली.या निवेदनावर प्रशांजित गव्हांदे, संतोष साळुंके, वैष्णवी गोलाईत आणि अमृता तायडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिवकालीन मर्दानी युद्धकला प्रशिक्षण शिबिरास सुरुवात!

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** माँ भारती प्रतिष्ठान, तथा श्रीधर महाराज संस्थानच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या शिवकालीन मर्दानी युद्धकला प्रशिक्षण व व्यक्तिमत्त्व विकास शिबिरास शुक्रवारी श्री वारकरी भवनात उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. ३० मे पर्यंत चालणाऱ्या या शिबिरा दररोज सकाळी ६ ते १० यावेळेत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.

शिबिरात विद्यार्थ्यांना शिवकालीन शौर्य प्रशिक्षणासह पारंपरिक खेळ, व्यक्तिमत्त्व विकास, शास्त्र अध्ययन आणि संस्कार मूल्यांचे विशेष मार्गदर्शन दिले जाणार आहे. युवकांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास आणि राष्ट्रप्रेमाची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन प्रसंगी संस्थानचे विश्वस्त हभप. गोकुळ महाराज, बापूसाहेब करंदीकर, हभप. एकनाथ महाराज, वि.हिं.प. जिल्हाध्यक्ष राजेश झापर्डे, अमोल अंधारे, माजी नगरसेवक देवेंद्र देशमुख, माँ भारती प्रतिष्ठानच्या मनिषा संस्थापिका चांदुरकर, राजेंद्रसिंह राजपूत, ॲड. संजयकुमार बडगुजर, चंद्रशेखर शेवलकर, आशिष सराफ, महेश देशमुख, मंगेश तोमर, शिवाजी गायकवाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन चांदुरकर यांनी केले.शिबिरात सुमारे १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून, उद्याही नोंदणी प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

# हिंगणा शिवारातून २४ गाळे विजेच्या तारा चोरीला!

### महावितरणचे ९७ हजारांचे नुकसानः गुन्हा दाखल

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** गेल्या काही दिवसांपासून तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ होत असून, आता चोरट्यांनी थेट विजेच्या तारांनाच लक्ष्य केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तालुक्यातील हिंगणा शिवारातून तब्बल २४ गाळे विजेच्या तारा अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी १४ मे रोजी तामगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ७ मे रोजी ही चोरीची घटना घडली. मात्र, याप्रकरणी दि. १४ मे रोजी अधिकृत तक्रार नोंदविण्यात आली. चोरीला गेलेल्या विजेच्या तारांची किंमत सुमारे ९७ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. महावितरण कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ अर्जुन एकनाथ शेगोकार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास हिंगणा शिवारातील एका शेतकऱ्याने वीज वाहिनीच्या तारांबाबत संशयास्पद प्रकार घडल्याची माहिती दिली. त्यानंतर ८ मे रोजी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता मोरखडे डीपी परिसरातील मोठ्या प्रमाणावर विद्युत तारा चोरीला गेल्याचे समोर आले. अज्ञात चोरट्यांनी वीज वाहिनीचे तब्बल आठ खांब तोडून सुमारे ४.२ किलोमीटर लांबीच्या २४ गाळे तारा चोरून नेल्या. या प्रकारामुळे महावितरणचे आर्थिक नुकसान तर झालेच, शिवाय शेतकऱ्यांच्या शेतीपंपांचा वीजपुरवठाही विस्कळीत झाला आहे. चोरी झालेल्या तारांमध्ये विविध शेतकऱ्यांच्या शेतातील वीजवाहिन्यांचा समावेश आहे. या प्रकरणी वरिष्ठ तंत्रज्ञ अर्जुन शेगोकार यांच्या फिर्यादीवरून तामगाव पोलिसांनी भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ च्या कलम १३६ अन्वये अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# राष्ट्रीय कुडो स्पर्धेसाठी खामगावचे खेळाडू पुण्याकडे रवाना

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** येथील कुडो खेळाडू चौथ्या राष्ट्रीय कुडो चॅम्पियनशिप कप स्पर्धेसाठी पुण्याकडे रवाना झाले आहेत. सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या या यशामुळे खामगाव शहरासह बुलढाणा जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडूंमध्ये वैभवी वेरुळकर, ऋतुराज लबडे, प्रियांश गाडगे, हर्ष खुंटे, आरव रावणकर, प्रणव मोरे, कृतिका शेळके,प्रज्वल शेळके, धनश्री गांधी, आयुष मारोडे, सूर्या माळवंदे, कुणाल सोनले आणि अभय कुंदरम यांचा समावेश आहे.यावेळी बुलढाणा कुडो संघटनेचे अध्यक्ष महेंद्र रोहणकर आणि उपाध्यक्ष सुनील वानखेडे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. प्रशिक्षक यश सोनले आणि कुणाल सोनले यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी स्पर्धेसाठी विशेष तयारी केली आहे. राष्ट्रीय स्पर्धेत हे खेळाडू खामगाव शहर, बुलढाणा जिल्हा आणि महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# ज्वालाग्रही पदार्थ पडल्याने शरीर भाजले !

प्रतिनिधी १६ मे

**खामगाव:** मालवाहू वाहनातून प्रवास करत असताना ज्वालाग्रही पदार्थ असलेल्या कॅनचे झाकण अचानक उडाल्याने त्यातील रसायन महिलेच्या चेहऱ्यावर व अंगावर पडून ती भाजल्याची घटना हिवरखेड फाटा-उंद्री रोडदरम्यान पाळा फाट्याजवळ मंगळवारी घडली. या प्रकरणी वाहन चालकाविरुद्ध हिवरखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी कुरशीदबी सैयद मजीर (५०, रा. पिंप्री कोरडे, ता. खामगाव) या १२ मे रोजी दुपारी उंद्री येथे जाण्यासाठी भगवान महादेव वाळके (रा. उंद्री, ता. चिखली) यांच्या मालवाहूत बसल्या होत्या. वाहनात पाच लीटर क्षमतेच्या पांढऱ्या रंगाच्या कॅनमध्ये ज्वालाग्रही पदार्थ ठेवला होता. त्या कॅनमधून फेस येत असल्याचे फिर्यादींनी चालकाच्या निदर्शनास आणून दिले होते; परंतु कॅनचे झाकण अचानक उडाले आणि त्यातील ज्वालाग्रही पदार्थ फिर्यादींच्या डाव्या गालावर व अंगावर उडाला. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यासह शरीराच्या काही भागांवर झाल्या. भाजल्याच्या जखमा जखमी अवस्थेत त्यांनी वाहनातून खाली उतरून चिखली येथील डॉ. स्मिता दळवी यांच्या रुग्णालयात उपचार घेतले. उपचारानंतर त्यांनी हिवरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यावरून आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी विलास साखरे करीत आहेत.

# 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव'; ८७० ग्रा.पं.चा सहभाग

प्रतिनिधी १६ मे

**बुलढाणा :** ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य अधिक सक्षम व निरोगी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'माझं गाव आरोग्य संपन्न गाव' या अभियानाला बुलढाणा जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. जिल्ह्यातील एकूण ८७० ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग नोंदवून आरोग्यदायी गाव उभारण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या अभियानांतर्गत गावपातळीवर स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, लसीकरण, माता-बालआरोग्य, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोग प्रतिबंध, कुपोषण निर्मूलन, तंबाखूमुक्त परिसर, नियमित आरोग्य तपासणी तसेच जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. ग्रामपंचायत, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागामुळे अभियानाला अधिक गती मिळाली आहे. गावांमध्ये आरोग्य विषयक स्पर्धा, स्वच्छता मोहिम, रक्तदाब व मधुमेह तपासणी, पोषण जनजागृती, शाळांमधील आरोग्य शिक्षण तसेच पर्यावरण संवर्धन उपक्रमही आयोजित करण्यात येत आहेत.

कार्य 'निरोगी गाव - समृद्ध गाव' हा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचे अभियानातून सुरू असून जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात आरोग्याबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढत असून उर्वरित गावांनीही अभियानात सहभागी होऊन आरोग्य संपन्न घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. १६ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सुविधा 'शून्य', वसुली 'जोरात'!

## ◆रेल्वे पार्किंगमध्ये प्रवाशांची दिवसाढवळ्या लूट ◆मध्य रेल्वेचा कंत्राटदारावर वचक उरला नाही?

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** रेल्वे स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांच्या वाहनांसाठी सुरक्षित पार्किंग व्यवस्था असणे गरजेचे आहे. मात्र, मध्य रेल्वेच्या अंतर्गत येणाऱ्या रेल्वे स्थानक परिसरातील टू-व्हीलर आणि फोर-व्हीलर पार्किंगमध्ये सध्या प्रवाशांची उघड उघड आर्थिक लूट सुरू आहे. कोणतीही सोयी-सुविधा न देता केवळ मनमानी वसुली करण्याचा एकच धडाका कंत्राटदाराने लावला असून, या संपूर्ण प्रकाराकडे मध्य रेल्वेच्या वाणिज्यिक विभागाने जाणीवपूर्वक डोळेझाक केल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. प्रवासी संघटना असो की डी आर यु सी सी चे मेंबर असो त्यांची या सर्व प्रकरणात चुप्पी असून प्रवाशांच्या हक्कांसाठी कोण लढणार अशी विचारणा होत आहे. खासदार अनुप धोत्रे या असुविधांकडे लक्ष देतील काय अशी विचारणा आता प्रवासी करत आहे.







### भर उन्हात तापतात गाड्या; शेडचा पत्ताच नाही!

विदर्भातील आणि अकोल्यातील तापमान सध्या ४५ अंशांच्या पार गेले आहे. अशा भीषण उन्हात प्रवाशांच्या लाखो रुपयांच्या दुचाकी आणि चारचाकी गाड्या पार्किंगमध्ये उघड्यावर शेडशिवाय दिवसभर तापत आहेत. अतिउष्णतेमुळे गाड्यांचे टायर, सीट कव्हर आणि इंजिनचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पार्किंगच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा पैशांची वसुली करणाऱ्या कंत्राटदाराला या ठिकाणी साधे शेड उभारण्याचीही सौजन्य दाखवता आलेले नाही. लाखो रुपये किंमतीच्या गाड्या उन्हात ठेवताना प्रवाशांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागतो.

### केवळ वसुली जोरात, सुरक्षा धोक्यात!

पार्किंगमध्ये गाड्यांच्या सुरक्षेची कोणतीही हमी नाही. अनेक गाड्यांना स्क्रॅच पडणे, पेट्रोल चोरी होणे अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या आहेत. मात्र, तक्रार करायला गेल्यास कंत्राटदाराची माणसे दादागिरी करतात. सुविधा देण्याच्या नावावर 'शून्य' असलेल्या या पार्किंगमध्ये फक्त आणि फक्त पैशांची वसुली मात्र 'सुसाट' सुरू आहे.

### वाणिज्यिक विभागाचे दुर्लक्ष

नियम आणि अटींचे उल्लंघन करणाऱ्या कंत्राटदारावर वचक ठेवण्याची जबाबदारी मध्य रेल्वेच्या वाणिज्यिक विभागाची आहे. मात्र, रेल्वेचे अधिकारी केवळ कार्यालयात बसून असल्यामुळे कंत्राटदाराची मुजोरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. पार्किंगचे अधिकृत दर फलक न लावणे, प्रवाशांशी उद्धट वर्तणूक करणे आणि मनमानी दर आकारणे असे प्रकार येथे सर्रास सुरू आहेत. यावरून रेल्वे अधिकारी आणि कंत्राटदार यांचे काही साटेलोटे तर नाही ना? अशी शंका प्रवाशांमधून उपस्थित केली जात आहे.

### प्रवाशांचे थेट सवाल:

रेल्वे प्रशासन कारवाई कधी करणार? प्रवाशांची लूट उघड्या डोळ्यांनी पाहणारे रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी कंत्राटदाराचा परवाना रद्द का करत नाहीत?अवाढव्य दराच्या बदल्यात सुविधा कुठे आहेत? उन्हापासून गाड्या वाचवण्यासाठी शेड आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कंत्राटदार कधी करणार?

# योगायोग : शनिवारी शनी जयंती आल्याने यंदा शनी जयंतीचे महत्व अधिक

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** शनिवार, १६ मे रोजी ज्येष्ठ महिन्यातील अमावस्या आली आहे.

या तारखेला नऊ ग्रहांपैकी एक असलेल्या श्री शनिदेवांची जयंती आहे. यावेळी अमावस्या अधिकच महत्त्वपूर्ण आहे. शनिवारी अमावस्या असल्याने आणि शनी व शनिवारच्या युतीमुळे भरणी नक्षत्र, सौभाग्य योग, वृषभ, बुध आदित्य योग, चंद्र, मंगळ योग इत्यादी अनेक दुर्मिळ योग निर्माण होत असल्याने, शनिजयंतीला पूजा करणे अत्यंत पुण्यकारक ठरेल.

**मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन**

शनि जयंतीनिमित्त शहरातील शनि मंदिरांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिदेवाच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची मंदिरांमध्ये गर्दी दिसून आली.

**गांधी रोडवरील प्राचीन जागृत शनि मंदिर**

या जागृत शनि मंदिरात शनि जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ मे रोजी, सकाळी ५ ते दुपारी २ या वेळेत शनि मूर्तीची प्रतिष्ठापना केली गेली. सायंकाळी ५ वाजता सजावट होईल आणि रात्री ११ वाजता महाआरती होईल. इच्छापूर्तीसाठी दिवा लावला जाईल.



**जुने शहरातील किल्ला चौकातील प्रसिद्ध श्री शनि देव मंदिर**

जुने शहरातील किल्ला चौकात असलेल्या प्रसिद्ध शनिदेव मंदिरासमोर आकर्षक बलून ची सजावट करण्यात आली आहे मंदिरासमोर मंडप उभारण्यात आला आहे सकाळपासून उशिरा रात्रीपर्यंत दर्शनासाठी नागरिकांनी गर्दी केली होती मंदिरात कलश आणि ज्योती प्रज्वलित करण्यात आली. मंत्रोच्चार नवग्रह पूजन, हवन, पूर्णाहुती, आणि महाप्रसाद वाटप केले जाईल.



◆गीता नगर परिसरातील शनी मंदिरात सुद्धा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे या मंदिरातही दर्शनासाठी पहाटेपासून नागरिकांनी चांगलीच गर्दी केल्याचे पहावयास मिळाली श्री शनि जयंतीला शनि देवांचे दर्शन घेतल्याने सर्व दुःख आणि कष्ट दूर होतात शनि महाराज आपल्या भक्तांसाठी अत्यंत दयाळू आहेत यावर्षी शनिवारी शनी जयंती आल्याने या शनी जयंतीचे विशेष महत्त्व असल्याची माहिती नवग्रह मंदिराचे पुजाऱ्यांनी दिली

# 'हात दाखवा, बस थांबवा' घोषणा फसवी

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** एसटी महामंडळाची सेवा ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जीवनवाहिनी मानली जाते. प्रवाशांच्या सोयीसाठी महामंडळाकडून 'हात दाखवा, बस थांबवा' या उपक्रमाचा प्रचार केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत बस न थांबल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. आवश्यक ठिकाणी बसेस थांबवण्याची नागरिकांची मागणी आहे. उन्हातान्हात लोकं बसची वाट पाहत उभे राहतात आणि वाहक चालक दखल न घेता निघून जातात.

# अशोक वाटिका ते नेहरू पार्क दरम्यान व्यावसायिकांचे अतिक्रमण हटवले

## ♦ रस्त्याच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणाचा नागरिकांना त्रास

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** अशोक वाटिका ते नेहरू पार्क दरम्यान अस्थाई विक्रेत्यांनी अतिक्रमण केले होते. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने शुक्रवारी या विरूद्ध कारवाई केली. इतकेच नाही तर अतिक्रमण धारकांनी झोपड्या तयार करून राहण्याची सोय केली होती. त्या देखील हटवल्या.

काही दिवसांपासून शहरात अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जात आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला व्यावसायिकांनी अतिक्रमण केल्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे कारवाई करण्याची गरज होती. शुक्रवारी सकाळ पासून या भागात अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. शहरात सध्या विविध भागातील अतिक्रमण काढले जात आहे. तरीही मुख्य रस्त्यावरील अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे अशी जनभावना आहे.



# एकीकडे आठ दिवसाआड पाणी दुसरीकडे अपव्यय

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** जलवाहिनी फुटल्याने गांधी चौकात पाणीच पाणी झाले.

महापालिकेपासून हाकेच्या अंतरावर हा भाग आहे मात्र जलप्रदाय विभागाने तातडीने दुरूस्ती साठी हालचाल केली नाही. त्यामुळे पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय झाला.



काटेपूर्णा प्रकल्पातील पाणी साठा दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक बदलले आहे. आता पाच दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. परंतु काही भागात तर आठव्या दिवशी पाणी पुरवठा होणार आहे.

पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक सध्या विस्कळीत झालेले दिसते. शहरातील पाणी समस्या गंभीर होत आहे. पाणी जपून वापरण्याशिवाय पर्याय नाही. याबाबत सजग राहणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आणखी दोन महिने तरी उपलब्ध पाण्यावर भागवावे लागणार आहे.



# पेट्रोल व डिझेल सोबतच तांदूळ, शेंगदाणा व डाळीचे वाढले भाव

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** अमेरिका इसराइल इराण युद्धाचा परिणाम आता ठळकपणे जाणवत आहे कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे देशातील महागाईचा दबाव आणखी तीव्र झाला आहे कालच पेट्रोल आणि डिझेलच्या किमती तीन तीन रुपयांची वाढ झाल्याने याचा परिणाम आता खाद्य सामग्रीवर दिसून येत आहे तांदळाचे भावही प्रत्येकी पाच रुपयांनी वाढले असून तूर डाळ व चना डाळीच्या दारातही पाच रुपयांनी वाढ झाली आहे तर दुसरीकडे रोजच्या चहासाठी वापरण्यात येणारी साखर ही कडू झाली साखरेचे दर दोन ते तीन रुपयांनी जादा झाल्याने सकाळचा चहा महाग झाला आहे.

### अशी झाली दरवाढ

| वस्तु | पूर्वीचे दर | सध्याचे दर |
|---|---|---|
| साखर | ४२ | ४५ |
| शेंगदाणा | १५० | १६० |
| उडीद डाळ | १२५ | १३० |
| खोबरे | ४२० | ४३० |
| आंबेमोहोर तांदूळ | १४० | १५० |
| तुरदाळ | १३५ | १४० |
| चणाडाळ | ७५ | ८० |

### पुढे भाव उतरण्याची शक्यता कमी

शहरातील काही व्यवसायिकांशी चर्चा केल्यानंतर असे समोर आले की पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तीन रुपयांनी वाढ झाल्याने विविध वस्तूंच्या दरात अजून वाढ होऊ शकते त्यामुळे पुढे भाव कमी होण्याचा प्रश्नच नाही असं बाजारातील व्यापाऱ्यांचे मत आहे

### पेट्रोल व डिझेलचे भाव वाढल्याने वाहतुकीचा खर्च वाढला

वाहतुकीचा खर्च वाढल्याने साखर डाळ व तांदूळ त्यांची भाव वाढ झाली आहे तसेच भाजीपाला कडधान्य आणि खाद्यतेल महाग झाल्याने नागरिकांचा खर्च वाढला आहे.

# सर्वसामान्यांसह मध्यमवर्गीयांचे बजेट कोलमडले

## ■ महागाईचा उद्रेक ■ सर्वच वस्तूंवर 5 ते 15 रूपयांपर्यंत वाढ

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** गुरुवारी मध्यरात्रीपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्याची घोषणा होताच रातोरात सर्वच्या वस्तूंच्या दरात जवळपास ५ रूपयांपासून ते १५ रूपयांपर्यत घसघशीत वाढ झाल्यामुळे सर्वसामान्यांसह मध्यवर्गीयांचे बजेट कोलमडले आहे. भाजीपाला, खाद्यतेल, खासगी प्रवासी वाहतूक यांच्या दरात वाढ झाली आहे. याचा सरळ परिणाम दैनंदिन जीवनावर होत असून, आधीच महागाईचा भडका उडाला असताना आता त्यात पेट्रोल-डिझेलची वाढ झाल्याने जणू महागाईचा उद्रेक झाल्याची शहरवासीयांमधून प्रतिक्रिया उमटत आहे. हा तर सर्वसामान्यांच्या खिशावर



डल्ला असल्याची भावना बळावत आहे. या महागाईने नागरिकांचे जगणेच कठीण करून टाकले आहे. मध्यपूर्वेत सुरू असल्याचा परिणाम भारतातील सर्वसामान्य घटकावर पडला आहे. जवळपास तीन महिन्यांपासून नागरिक महागाईच्या आगीत होरपहत असताना गुरूवार, १४ मे च्या मध्यरात्रीपासून पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या किमती वाढविल्याने शुक्रवारपासून याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर होण्यास सुरूवात झाली आहे. शुक्रवारच्या सकाळपासूनच प्रत्येक वस्तूच्या किमती वाढण्यास सुरूवात झाली. यामध्ये पहिला नंबर लागला तो भाजीपाल्याचा दरमान दोन दिवसापूर्वीच खाद्य तेलाच्या (सोयाबीन) किमतीमध्ये किलोमागे १५ रूपयांची वाढ झाली आहे. कालपर्यंत ३० रूपये किलो असलेले टोमॅटो ५० रूपयांपर्यंत पोहोचले आहेत. कोथिंबीर १० रूपयाची जुडी आता ४० रूपये पाव झाली आहे. अशाप्रकारे सर्वच वस्तूंचे दर आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले असून, त्यात आणखी वाढ होण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांच्या संयमाचा बांध केव्हा फुटेल, याचा काही नेम राहिला नाही.

# अखेर वाशिमकरांचे मुंबई रेल्वेचे स्वप्न पूर्ण 19 मेपासून नांदेड–मुंबई द्विसाप्ताहिक एक्सप्रेस सुरू

प्रतिनिधी १६ मे

**वाशिम :** वाशिम आणि हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मुंबईसाठीची थेट रेल्वे सेवा अखेर सुरू होत असून, नांदेड–मुंबई (एलटीटी) द्विसाप्ताहिक एक्सप्रेस १९ मे २०२६ पासून प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे.

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख यांनी रेल्वे मंत्रालयाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे ही महत्त्वाची सेवा सुरू होत असल्याची माहिती नांदेड रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य तथा वाशिम व्यापारी



मंडळाचे अध्यक्ष जुगलकिशोर कोठारी यांनी दिली. या नव्या रेल्वे सेवेमुळे वाशिम, हिंगोली, पुसद आणि परिसरातील प्रवाशांना आता मुंबईसाठी थेट प्रवासाची सुविधा मिळणार आहे. यापूर्वी मुंबईला जाण्यासाठी नागरिकांना खासगी प्रवासी वाहनांचा वापर करावा लागत होता किंवा अकोला येथून रेल्वे पकडावी लागत होती. त्यामुळे वेळ आणि पैशांचा अतिरिक्त खर्च होत होता.रेल्वेच्या वेळापत्रकानुसार, नांदेडहून ही गाडी सोमवार आणि बुधवारी रात्री सुटून वाशिममार्गे दुसऱ्या दिवशी मुंबईला पोहोचणार आहे. तर मुंबईहून मंगळवार आणि गुरुवारी ही गाडी वाशिममार्गे नांदेडकडे धावणार आहे. १९ मे रोजी या रेल्वे सेवेचा विशेष शुभारंभ करण्यात येणार असून, या निर्णयामुळे जिल्ह्याच्या दळणवळण आणि व्यापार क्षेत्राला मोठी चालना मिळणार असल्याचे मानले जात आहे. नागरिकांकडूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

# वीर हनुमान चौकातील खड्ड्यामुळे वाहतुकीचा खोळंबा

**वाहनांच्या दररोज लागत आहेत रांगा**

प्रतिनिधी १६ मे

**अकोला :** अगरवेस भागातील वीर हनुमान चौकात डेली निडसच्या बाजूला महापालिकेच्या वॉल्वचा खड्डा आहे. यामुळे वाहतूक खोळंबते. रात्री तर वाहनांची रांग लागली होती. हा प्रकार दिवसा एक दोन वेळा तरी होतो असे या भागातील रहिवाशांचे म्हणणे आहे. वाहतूक शाखेने लोकांना होत असणारा रोजचा त्रास दूर करावा अशी मागणी केली जात आहे. हा रस्ता खूप अरूंद आहे परंतु चारही दिशांनी लहान मोठी वाहने ये जा करीत असतात. त्यामुळे वाहन चालकांना कसरत करावी लागते. जॅम झाला तर पंधरा वीस मिनिटे पुढे जाता येत नाही. ही समस्या खूप जुनी आहे. आणि दिवसेंदिवस या भागातील रहदारीचा प्रश्न जटिल होत आहे. मोठे वाहन रस्त्याने जात असेल तर वाट मोकळी होईपर्यंत प्रतिक्षा करावी लागते. या भागातील समस्या दूर होण्याची गरज आहे. तसेच खोदून ठेवलेल्या खड्ड्यामुळे निर्माण झालेली समस्या दूर करण्यासाठी महापालिकेच्या जलप्रदाय विभागाने



तातडीने लक्ष द्यावे अशी मागणी देखील या भागातील रहिवासी तसेच शहरवासी करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK